# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १३ माहे जुलई सन १९०८ इसवी [अंक २६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपय
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A Phillips
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३


### ❋ इकडे लक्ष द्या ! ❋

त्वरा करा ! त्वरा करा !

आम्ही येथें विक्रीकरितां नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, रंगीत पिठोरी १। रु० यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी पांचशें घेतल्यास ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.


### नोटीस

किसन वलद चांग्या महार व गग्या वलद संभ्या महार व दावल्या वलद माहोल्या महार व शेकर वलद मुद्या महार राहणार कवठे बुजरुक प्रगणे आकोट तालुके अकोट जिल्हा आकोला यांसः—

खालीं सही करणाराकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं तुमचे गांवावर उत्पन्न होण्याचे त्या पिकावर प्रत्येक शेतवाल्यापासून दर एकरास दोन शेर प्रमाणें आह्मी घेत असतो असा तुह्मी आपला हक्क दाखवून त्याप्रमाणें तहशिलदार साहेब तालुके अकोट याजकडेस अर्ज केला. त्या अर्जाप्रमाणें प्रत्येक शेतवाल्याकडून तुह्मास तहशिलदार साहेब यांनीं भीक देवविली कमिशनर साहेब बहादूर प्रांत वऱ्हाड यांचे ठरावाप्रमाणें तुह्मास पऱ्हाटी व जवस हीं पिकें खेरीजकरून बाकीचे पिकावर ज्वारी दोन शेर दर एकरास द्यावी असें असतां त्या विरुद्ध तुह्मी अर्ज केला आहे व आमचेकडून पऱ्हाटीचे पिकासुद्धां पायली तीन मण आठ पायली घेतली सबब तुह्मास अशी नोटीस देण्यांत येतें कीं ज्वारीचे पिकाबद्दल दर एकरी दोन शेर प्रमाणें ज्वारी ठेऊन बाकीचे पऱ्हाटीची भीक वापस करावी. जर तुह्मी असें न केलें तर दिवाणींत दावा करून तुमचेंपासून पऱ्हाटीचे भिकेसंबंधानें जे रुपये दिले आहेत ते वापस घेतले जातील. कळावें ता. १०-७-०८ इसवी

सही
गोपाळ खुशालराव वकील
नं. ग. ८० रा. आकोला

### नोटिशीचें उत्तर

रा. नारायण पांडुरंग रावसाहेब नेटीव डाक्तर राहणार पारस तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुमची तारीख १७-६-०८ ची नोटीस पावली आपण लिहितां त्याप्रमाणें तुमच्याशीं आह्मी मुळींच सवदा केला नाहीं. आपण रुपये घेऊन आलों असें ह्मणतां तें ह्मणणेंही मजला कबूल नाहीं खोट्या नोटिशी देऊन आमचे शेती संबंधानें तुह्मी विनाकारण भानगड उत्पन्न करूं नये. याउपर भानगड उत्पन्न कराल तर त्यासंबंधानें मी कोणत्याही तऱ्हेनें जबाबदार नाहीं. कळावें ता. ८-७-०८ इ.

सही
संभु पुंजाजी माळी मालेगांव
नं. ग. ८१ दस्तुर खुद

### जाहिरात

गरजूंनीं अवश्य लक्ष द्यावें.

आकोला येथील हिरजी धरमसी या नावाच्या जिनींग फ्याक्टरींतील खालील सामान विकाऊ आहे.

( १ ) मेसर्स मारशलीस आणि सन्स या कंपनीचा एक बॉयलर दोन वर्षें वापरलेला आहे. त्याचा आकार ६+२२ आहे. त्याचें वाफेचें प्रेशर १२५ पौंड आहे. बायलर अगदीं नव्या सारखा आहे.

( २ ) मेसर्स मारशलीस आणि सन्स याच कंपनीचें एक इंजिन आहे. त्याची हार्सपावर १९ आहे, १३ इंच सिलेंडरचा डायामेटर आहे. ३५ इंचाचा पिस्टनचा स्ट्रोक आहे त्याची गती ८० आहे. हें इंजिन सुद्धा दोनच वर्षें वापरलेलें आहे.

( ३ ) त्या शिवाय फ्यक्टरीला लागणारे डॉकी पंप, लेथ, फायर पंपस, डाईस बाक्स, चिमणी वगैरे सामान आहे. सामान अगदीं नवे आहे.

( ४ ) प्लॅट ब्रदर्सचीं ३० जिनें आहेत पण तीं दोन वर्षापूर्वीं लागलेल्या आगीमुळें जरा नुकसान पाऊन प्लाटफार्मच्या खालीं पडलीं आहेत.

वरील सामान घेण्याची कोणाची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. पण जर कोणाला त्याच ठिकाणीं जीन फ्याक्टरी पुन्हा बांधणें असेल त्यांनीं आह्माला समक्ष येऊन भेटावे. फ्याक्टरी पाहण्याकरितां नेहमीं मोकळी ठेवली आहे.

पत्ताः—हिरजी धरमसी.
Out-.Fort Moodi Bazar
Kazi Sayed Street N0 25-
N. G. 82 BOMBAY

### नोटीस

विद्यमान सुभेदार साहेब सबजज्ज कोर्ट अकोला यांचे कोर्टातून.
स० स० मु० नंबर ६ सन १९०८ इ०

या नोटिशीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येतें आहे कीं अर्जदार भूमय्या वलद रंगय्या राहणार उमरावती यानें आपला भाऊ कमळय्या वलद रंगय्या तेलंगी शिंपी राहणार अकोला हा तारीख १० दिसेंबर सन १९०७ रोजीं मरण पावल्यावरून मयत कमळय्या याचे नांवे मुंबई ब्रँच आकोला येथें रकम रुपये २२७४ ८५०९ जमा आहेत. तें मिळण्या करितां सकसेशन सरटिफिकीट आक्ट नंबर ७ सन १८८९ कलम प्रमाणें सरटिफिकीट मिळण्याकरितां आमचेकडे अर्ज दिला आहे त्याचे चौकशीची ता० १५ माहे आगष्ट सन १९०८ इ० ची नेमणी आहे. तरी सदरहू बद्दल कोणास कांहीं तक्रार वगैरे करणें असेल तर त्यानें आमचे कोर्टात वरील तारखेस १० वाजतां हजर व्हावे. हजर न झाल्यास पुढें कोणतीही सबब ऐकिली जाणार नाहीं.

आमच्या सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली असे आज ता० ७ माहे जुलै सन १९०८ इ०

N. G. Subhedar
Sub Judge Akola.
नं. ग. ८३

## वर्तमानसार

ज्यूरीने २ तास विचार करून ५ व ४ या प्रमाणांत काळ कर्ते दोषी असल्याचा निकाल दिला. ऐकमत्य अशक्य आहे काय, असा जज्जांनीं सवाल केल्यानंतर दोन्ही आरोपांवर आरोपी गुन्हेगार असल्याबद्दलचा त्यांनीं लेखी जबाब दिला. देशाभिमानानें प्रेरित होऊन लेख लिहिलेले आहेत ह्मणून निकाल देतांना ज्यूरीनें आरोपीवर दया करण्याबद्दल शिफारस केली आहे. जज्जांनीं राजद्रोहाच्या आरोपाबद्दल १९ महिन्यांची सक्तमजुरीची व जातिद्वेष वाढविण्याच्या आरोपाबद्दल ४ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली. ५१७ क्रि. प्रो. कोडखालीं छापखाना जप्त करण्याबद्दलच्या अर्जाबद्दल हा गुन्हा पहिलाच असल्यामुळें व आरोपी पुनः गुन्हा करणार नाहीं, अशी उमेद अस ल्यामुळे अडव्होकेट जनरलनीं तो आग्रह धरूं नये अशी जज्जांनीं शिफारस केली. ॲडव्होकेट जनरलनी त्याबद्दल आपण विचार करूं असें सांगितलीं.

कृष्णनगरचे डिस्ट्रिट मॅजिस्ट्रेट मि. इझिकेल यांजकडे कापूस भुसा वगैरे पदार्थांत फार काळजीपूर्क एक बाँब गुंडाळून त्याचें व्यवस्थित रीतीनें तयार केलेलें पार्सल आलें. मॅजिस्ट्रेटास पार्सल येण्यापूर्वीं एक धमकीचें पत्रही आलें होतें; सबब पार्सल फोडण्याच्या भानगडींत न पडतां त्यांनीं तें केमिकल ॲनालायझरकेड परिक्षणार्थ पाठविलें, अशी वंदता पसरली आहे.

कोंकिनारा येथील तागाच्या गिरणींत दंगा करून आग लावण्याचा यत्न केल्याच्या आरोपावरून गीरणींतील दहा कामकऱ्यांवर अलीपूरच्या सेशन्स कोर्टांत खटला चालू होता. ता. ४ रोजीं खटल्याच्या सुनावणीचें काम संपून दहा मिनिटें विचार केल्यावर ज्यूरानें एकमतानें आरोपी निर्दोषी आहेत असा अभिप्राय दिला. पांच आरोपीसंबंधानें डिस्ट्रिक्ट जज्जास तो अभिप्राय पसंत पडला; पण बाकीच्या पांच आरोपीसंबंधानें जज्ज व ज्यूरी यांजमध्यें मतभेद झाल्यामुळें जज्जांनीं खटला अभिप्रायासाठीं हायकोर्टाकडे पाठविला.

रा० टिळक यांचा खटला पोलिस कोर्टीत चालूं होता. तेव्हां गैरकायदा मंडळींत समाविष्ट होऊन दंगा केल्याबद्दल पकडलेल्या सहा इसमांवरील खटल्याचा निकाल मॅजिस्ट्रेटनीं सांगिला. साधू नसून साधूचा पोषाख करून व्याख्यान देणारा मगनलाल यास सहा माहने सक्तमजुरी, वामन यशवंत यास एक महिना सक्त मजुरी, दौलत महादेव व राम सूधन यास प्रत्येकीं सात दिवस सक्तमजुरी जेठामल यास चौदा दिवस सक्तमजुरीची अशा शिक्षा देण्यांत आल्या. जेठाशकर यास चार दिवस कैद अथवा ५० रुपये दंड अशी शिक्षा देण्यांत आली आहे.

अहमदनगरचे सुप्रसिद्ध वकील रा. बाळासाहेब देशपांडे यांनीं नगरापासून ५।७ मैलांवरील एका गांवीं राजद्रोही भाषण केल्याबद्दल त्यांजवर वारंट काढण्यासंबंधाचा मुंबई सरकारचा हुकूम तेथील कलेक्टरकडे गेला होता; परंतु क्षुल्लक गोष्टींस महत्व मिळून त्यायोगानें लोकमत क्षुब्ध होऊं नये, यासाठीं अहमदनगरच्या कलेक्टरसाहेबांनीं या बाबतींत मुंबई सरकारची सल्ला घेऊन एक वर्षेपर्यंत भाषणें न करण्याबद्दल रा. देशपांडे यांजपाशीं जामीन मागितली आहे. त्यावरून रा. देशपांडे यांनीं तीन दिवसांची मुदत मागून घेतली. वरील मुदतींत सर्व वकील मंडळी या गोष्टीसंबंधानें विचार करण्याकारितां रा. देशपांडे यांच्या घरीं जमली होती. रा. देशपांडे यांनीं या बाबतींत कलेक्टरसाहेबांकडे लेखी जबाब पाठविला आहे. पुढें काय होतें तें पहाणें आहे.

तिनिवेल्ली येथें सुब्रह्मण्यं शिव व चिंदबरं पिले यांच्यावरील राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल होऊन मि. ए. एफ. पिन्हे यांनीं सुब्रह्मण्यं शिव यांस दहा वर्षे काळेपाणी व चिंदंबरं पिले यांस जन्मठेप काळेपाणी अशा शिक्षा दिल्या. निकाल सांगतांना न्यायाधीश ह्मणाले:—"पहिल्या आरोपसिंबंधानें सारासार विचारास कांहीं जागा आहे, परंतु मि. चिदंबरं पिले यांची मात्र तशी गोष्ट नाहीं. समाजामध्यें त्यांचें चांगल्या प्रकारचें वजन असून ते नखशिखांत राजद्रोही आहेत. इतर ठिकाणी राजद्रोहाला ज्या सामान्य शिक्षा देतात, तीच शिक्षा यांना देणें ह्मणजे यांना फाजील दया दाखविण्यासारखें आहे. मि. चिदंबरं पिले यांजवरील दुसऱ्या आरोपाबद्दलही त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली असून या दोनही शिक्षा समकालीन भोगण्यांत याव्या असेंही त्यांनीं ठरविलें.

उर्दू स्वराज्याचे संपादक मुनशी शांतिनारायण यांस राजद्रोहाचा पहिल्या गुन्ह्याबद्दल अठरा महीन्यांची सक्तमजुरीची व ५०० रुपये दंड अथवा दंड न दिल्यास आणखी तीन महिन्यांची सक्तमजुरीची व दुसऱ्या गुन्ह्या बद्दल दोन वर्षांची सक्तमजूरीची आणि ५०० रुपये दंड अथवा दंड न दिल्यास आणखी तीन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा फर्माविण्यांत आली आहे. कोर्टानें निकाल सांगितला त्यावेळीं कोर्ट व सरकारी वकील या व्यतिरिक्त कोर्टीत कोणीही हजर नव्हतें.

## ग्रंथ परिचय

### लाला लजपथराय यांच्या हद्दपारीची हकीकत.

लाला लजपतराय हे आपल्या हद्दपारीसंबंधाचा समग्र खुलासा एक पुस्तक लिहून करणार असल्याचें पूर्वीं प्रसिद्ध झालें होतें. या पुस्तकावर होणारें उत्पन्न धर्मदायाचें कृत्य करण्याकडे खर्च होणार आहे, यामुळें वाचकांना एकांत दोन श्रेयें घेणें साधणार आहे. लालाजींचें हें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें असून त्यांचेविषयींचें आपलें प्रेम व धर्मकृत्याविषयींची आस्था लोकांनीं त्वरित व्यक्त करावी या हेतूनें आह्मी आज त्या पुस्तकाचा आमच्या वाचकांस परिचय करून देत आहों. प्रस्तुत पुस्तकावर इकडे आणि परदेशांत उड्या पडतील यांत शंका नाहीं आणि तसें झाल्यास कांहीं आश्चर्यहि नाहीं. चौकशीवांचून हद्दपारी केल्याचीं उदाहरणें सुधारलेल्या राज्यपद्धतीच्या अंमलांत कचितच घडत असतात यामुळें त्याला विशेष स्वरूप मिळतें हें एक प्रकरण असून दुसरें असें आहे कीं, लालाजींच्या हद्दपारीच्या संबंधातलें इंगित अद्याप बाहेर आलेलें नाहीं. लालाजींनीं आपली या संबंधांतली हकीकत अगदीं साध्या, सरळ व स्पष्ट शद्बांनीं लिहिली आहे. पंजाबांत झालेल्या खोडीमुळें जो परिणाम झाला त्याचें निरसन लालाजींच्या हद्दपारीमुळें झालें, सबब ती रास्त होती असें ह्मणण्यांत येतें, त्याला लालाजींनीं प्रस्तावनेंत समर्पक उत्तर दिलें आहे. वसाहतीसंबंधाचे कायदे नामंजूर झाल्यामुळें पंजाबांतील अस्वस्थता शमली. इतर प्रकारांमुळें लोकांना हतबुद्ध केले असेल पण खरी चळवळ वसाहतीसंबंधाचा कायदा नामंजूर होतांच बंद पडली. लालाजींच्या हद्दपारीच्या पूर्वींच रावळपिंडी प्रकरण झालें. रावळपिंडीच्या वकिलांवर काढण्यांत आलेल्या बेकायदा नोटिसा, त्यांच्यावर लादलेला दंग्यांचा खोटा आरोप इत्यादि दडपशाहीचे प्रकार कसे सुरू करण्यांत आले त्याचें वर्णन लालाजींनीं पहिल्या भागांत केलें आहे. रावळपिंडीच्या दंग्यासंबंधाच्या खटल्याचा चिरस्मरणीय निकाल सर्वश्रुतच आहे. हें प्रकरण उपस्थित होण्याचे पूर्वीं व त्यानंतर लालाजींच्या कांहीं भाषणांची कसून छाननी चालूं आहे अशी बातमी होती. लालाजींना रामसिंग यांचेप्रमाणें हद्दपार करणार असेंहि कोणी ह्मणत. रामसिंग हे एक धार्मिक पुरुष असून त्यांना कांहीं राजकरणी संशयावरून सन १८७२ मध्यें हद्दपार करून ब्रह्मदेशांत ठेवलें होतें. त्यांचा तितडेच अंत झाला. रामसिंगजीप्रमाणें हद्दपार झालेले लालाजी सुदैवानें परत स्वगृहीं आणि स्वदेशकार्यासाठीं आले आहेत. आपणावर खटला होणार अशी कुणकुण त्यांना पूर्वीं कळलेली होतीच आणि ते तशा तयारींतच होते, पण हद्दपारी होण्या इतकें महत्व आपल्याला आहे किंवा ती होण्याइतकें विशेष कांहीं आपण केलें आहे असें त्यांस वाटत नव्हतें. आपणावर प्रसंग येणार हें पक्कें कळून चुकतांच त्यांनीं आपल्या परमपूज्य वडिलांस तें वर्तमान कळवून अगोदरच त्यांच्या मनाची तयारी करून ठेवली. लालाजींना कशा गुप्त रीतीनें ताब्यांत घेऊन हद्दपारीवर रवाना करण्यांत आले या विषयींची हकीकत त्यावेळीं वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेली बहुतेक यथार्थ आहे. लोकांना ही बातमी समजल्यास त्यांचेकडून कांहीं तरी नाखुषी प्रदर्शक प्रकार होईल अशा रीतीनें केलेला बंदोबस्त इतका अतिरेकाला पोंचला होता कीं शेवटीं तो हास्यास्पद झाला. घरांतून काढून लालाजींना मियानमीर येथें लष्करी तुरुंगांत कांहीं वेळ ठेवलें होतें तेथें तर एकंदर प्रकाराचा विचार करतां लालाजींस खरोखरच हसूं कोसळलें होतें. इतक्या सायासानें केलेल्या बंदोबस्ताचा उपयोग कांहीं तरी व्हावयाचा होता ! पण तोही झाला नाहीं. मंडालेच्या स्टेशनवर रा. देवधर यांनीं लालाजी पोलिस अधिकाऱ्यांच्या गराड्यांत असतांनाहि त्यांच्या पायावर लोळण घेतली. रा. देवधरांचा उद्देश सफल झाल्यावर मग पोलिसांनीं त्यांना बाजूला खेंचून काढलें ! एकानें लागलाच लालाजींचा दंड धरला ! संपलें !

मंडालेच्या किल्यांत प्रवेश केल्यावर लाला लजपतराय स्वदेशबंधवांच्या नजरेआड झालें, तथापि त्यांची मूर्ति त्यांच्या हृदयांत जास्त पक्कें ठाणें देऊन राहिली. जरी त्यांना स्वतंत्र घर रहावयास देण्यांत आलें होतें तरी सर्व मुदतींत त्यांच्यावर डोळ्यांत तेल घालून पहारा होता. त्यांना लाहोरास पोलिसानें आपल्या ताब्यांत घेतलें तेव्हांच आपल्याला योग्य रीतीनें वागविण्यांत येईल असें आश्वासन लाहोरचे कमिशनर यांनीं दिलें होतें. त्यांना त्यांच्या दर्ज्याप्रमाणें सुखांत ठेवण्यांत येईल असें स्टेटसेक्रेटरी यांनीं वारंवार हाउस ऑफ कॉमन्समध्यें बोलून दाखविलें. सरकारांतून मिळालेली पैशाची मंजुरी लालाजींच्या साध्या रहाणीला पुरेशी होती. पण स्टेट सेक्रेटरी किंवा हिंदुस्थान सरकार यांपैकीं एकाच्याही प्रत्यक्ष ताब्यांत लालाजी नव्हते. ते तेथील तुरुंगावरच्या सुपरिंटेंडंट साहेबांच्या तब्यांत होते. हे साहेब ह्मणजे फाटक्या तुटक्या साहेब अधिकाऱ्यांपैकीं निवडक मूर्ति होती. बारिक सारिक बाबतींत या साहेबांनीं गाजविलेला अधिकार लालाजींस फारच त्रासदायक झाला असला पाहिजे. जेलखान्यांतील या अंमलदार साहेबांना हजामत ही सुद्धां चैनीची गोष्ट वाटून त्यांनीं लालाजी प्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चांत तीबद्दल पैसे खर्चण्याचें नाकारलें होतें. दोनशे रुपये दरमहा ज्या एकट्या माणसाकरितां खर्चण्यास सरकार तयार होतें त्याला बर्फ हा फाजील चैनीचा पदार्थ ह्मणून घेण्याची या साहेबांची बंदी होती. वास्तवीक लालाजींची सर्व व्यवस्था सुपरिंटेंडेंट साहेबांच्या भामट्या बटलराचे हातीं होती. असल्या क्षुद्र मनुष्याचे हातीं सर्व व्यवस्था जाऊन त्यांच्यापाशीं खाण्यापिण्यासाठीं तोंड वेंगाडण्याचा प्रसंग यावा हें कोणीहि सभ्य व अब्रुदार गृहस्थाला अपमानास्पद वाटेल अशी तक्रार लालाजींनीं सुपरटेंडेंट साहेबांकडे केली होती. लालाजींना हजमतीबद्दल खाजगी पैशांतून करावा लागलेला खर्च सरकारांतून परत देण्याविषयीं हुकूम झाला असतां व ती रकम सुपरिंटेंडट साहेबांकडे आलेली असतां शेवटीं लालाजींच्या हातीं पडली नाहीं ती नाहींच. लालाजींना कोणी सलाम केला तर त्यांच्यावर देखरेखीसाठीं असलेल्या अंमलदारांना मोठा घुस्सा येई. सलाम करणाऱ्या पुष्कळ असामींना त्यांनीं पकडलें होतें. पण लालाजीसारख्यांना सलाम करणें हा गुन्हा आहे असें अद्याप कायद्यानें ठरवून ठेवलेलें नसल्यामुळें त्यांची मुक्तता झाली. लोक लालाजींना वंदन करून त्यांचे विषयींची आपल्या मनांतील पूज्यबुद्धि व्यक्त करण्यास मुळींच कचरत नसत. एकदोघांनीं तर तसें करण्याला हरकत झाली असतां रोख जबाब दिले. या शिवाय अनेक प्रकार असे घडलेले आहेत कीं ज्यांच्या संबंधानें योग्य उत्तर देण्यास अद्याप कोणी पुढें आलेलें नाहीं. लालाजी व अजितासिंहजी यांची हिंदुस्थान सरकारच्या हुकमानें मुक्तता झाली तेव्हां दोघांना एकमेकांपासून इतक्या सक्तीनें दूर कां ठेवण्याची खटपट झाली हें कळत नाहीं. रंगूनास जातांना बोटीच्या तळमजल्यांत माल सांठविण्याचे जागीं बसण्याचा हुकूम लालाजींना झाला तोही योग्य नव्हता हें लालाजींच्या जबाबामुळें त्यांच्याबरोबरच्या अंमलदारांच्या डोळ्यांत अंजन पडल्यावर त्यांना लागलेंच कळून आलें. लालाजींनीं आपल्या संबंधानें खोट्यानाट्या बातम्या प्रसिद्ध करण्यांत पुढारी ह्मणून लाहोरचें 'सिव्हिल मिलिटरी गॅझेट' व कलकत्त्याचें 'इंग्लिशमन या पत्रांवर व विलायतेंतील डेली मेल पत्रांवर फिर्यादी केल्या आहेत. या पत्रांत प्रसिद्ध झालेला मजकूर सपसेल खोटा आणि खोडसाळपणाचा आहे. असें लालाजींनीं पुनः या पुस्तकांत स्पष्ट शद्बांनीं ह्मटलें आहे. लालाजींना वर्तमानपत्रें मुळींच वाचावयास देत नसत. कांहीं मासिक पुस्तकें, व तींही लालाजी किंवा अजितासिंहजी यांचे संबंधाचा कांहीं मजकूर असल्यास तो काढून टाकून देत असत. रंगून येथील एक दोन गृहस्थांचे प्रेमामुळें त्यांना उत्तम उत्तम ग्रंथ मात्र वाचावयास भरपूर मिळाले. या ग्रंथांचें परिशीलनानें आपले विचार जास्त प्रगल्भ व ठाम झाले असें त्यांनीं ह्मटलें आहे. पत्र व्यवहारासंबंधानें पार्लमेंटांत स्टेट सेक्रेटरी यांचे कडून कांहींहि खुलासा झालेला असला तरी या संबंधांत वाजवी पेक्षां जास्त कडकपणा राहिला होता असें लालाजींच्या लिहिण्यावरून दिसतें. कांहीं पत्रें त्यांना हद्दपारीच्या मुदतींत न देतां मागाहून देण्यांत आलीं. ना० गोखले यांनीं लिहिलेलें एक पत्र तर त्यांना मुळींच मिळालें नाहीं. ना० दिक्षित, सॉलिसिटर यांचें पत्रही त्यांना वेळेवर मिळूं शकलें नाहीं. यावरून वरील विधानास पुष्टी येते. एकंदरींत सरकारच्या त्यावेळच्या विवेकभ्रष्टतेचा हा इतिहास सरकार व

र्क या दोघांनाहीं भावी काळांत उपयुक्त झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. लालाजींना व्यर्थ हद्दपार केले असा अद्याप लोकांचा समज आहे आणि त्याचे विरुद्ध सप्रमाण पुरावा सिद्ध होईपर्यंत तो तसाच कायम रहाणार आहे हें उघड आहे. लालाजींनीं आपल्या वरील प्रसंगांत दाखविलेले मनोधैर्य अत्यंत प्रशंसनीय होते. हतबुद्ध करणाऱ्या अशा प्रसंगांतून पार पडल्यावर मुद्दां स्वदेश व स्वसमाज यांच्या सेवेचा त्यांचा व्यवसाय उत्साहानें व एक निष्ठेनें चालू आहे; या वरून त्यांच्याविषयीं आदर व पूज्य बुद्धी बाळगणाऱ्यांनीं पुष्कळ शिकावयाजोगें आहे.

# वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध १५ शके १८३०

## वृत्तपत्रांची मुस्कुटदाबी.

वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा हिंदुस्थान सरकारचे कायदेकौन्सिल थोड्याच अवधींत प्रसवणार असें लॉर्ड मिंटो यांच्या उद्गारावरून स्पष्ट झालेलें आहे. अशा वेळीं 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्तकांत मॅक्स नार्डो यांच्या 'कॉन्व्हेन्शनल लाईज' नांवाच्या ग्रंथांतील एका भागाच्या आधारानें रा. मंगेश शिवाजी तेलंग बी. ए. एल एल बी यांनीं लिहिलेला एक लेख 'मुद्रण स्वातंत्र्याची मिमांसा या मथळ्या खालीं प्रसिद्ध झालेला आहे. युरोपांतील कृत्रिम व्यवहाराच्या अतिरेकाला विटून मि. नार्डो यांनीं आपला ग्रंथ लिहिलेला आहे व त्याला नांव देतांना आपला हेतु व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. रूढीमुळें जे कांहीं प्रकार भाषेंत किंवा व्यावहारांत शिरलेले आहेत ते दाखवून देऊन, त्यांची विल्हेवाट कशी लावावयाची ते सुचविण्याचा प्रयत्न मि. नार्डो यांनीं केला आहे; पण त्यांची पद्धति दीर्घकालच्या अनुभावानें शास्त्रज्ञांकडून अप्रशस्त ठरलेल्या तर्क पद्धतीवर रचलेली असल्यामुळें, प्रसगीं त्यांचे हातून आपल्या ठरीव तत्वाचें स्थापनेसाठीं सत्याचा अपलाप, किंवा अतिशयोक्ति इत्यादि प्रकारांनीं एक प्रकारच्या असत्याचा आश्रय असे निंद्य प्रकार झाले आहेत. हे प्रकार कां झाले हें कोणीही विचारी मनुष्य जाणूं शकेल. व्यवहारांतील कांहीं विशेष ढोबळ उदाहरणांवरून, व्यथित झालेल्या मनानें एक सिद्धांत रचावयाचा व तो अबाधित रहावा ह्मणून त्याला जुळतील अशा रीतीनें उदाहरणें तयार करावयाचीं. जो मनस्वी विचारकर्त्यांच्या अंगच्या दुर्गुणांपैकी एक प्रकार, त्याला मि. नार्डो हे बळी पडलेले आहेत. त्यांचें सुदैव इतकेंच कीं, वृत्तपत्रें अशाच मार्गानें जाऊन समाजाचे मनांत खळबळ उत्पन्न करतात ह्मणून त्यांना निर्बंध घालून देण्याचा कायदा त्यांच्या सूचनेप्रमाणें झालेला असतां, तरी प्रस्तुत लेख त्यांनीं वर्तमानपत्रांत न छापतां स्वतंत्र पुस्तकरूपानें काढला आहे; पुस्तकांत कोणत्याही प्रकारचे विचार प्रसिद्ध होण्याला मनाई नसावी असें खुद्द मि. नार्डो यांचें मत होतें; आणि निदान हा दुसरा भाग तरी युरोपांतील सरकारांनीं अद्यापपर्यंत मान्य केलेला आहे. 'कोणतीही राजकीय सुधारणा, कसलेही कायदेकानू, वृत्तपत्रांच्या अनुमतिशिवाय व साहाय्याशिवाय प्रजेवर लादणें' युरोपांतील कांहीं 'सरकारांस अशक्य झालें आहे;' याला कारण त्यांचें समाजावरील वजन आहे; लोक मताचें काम वृत्तपत्रें बजावतात ह्मणूनच त्यांची शक्ति 'कर्तृ व कर्तृं' अशी झाली आहे; ती न्याय्य नाहीं; अशा रीतीनें विचार करून मि. नार्डो ह्मणतात, 'लोकमताचा अत्युच्च अधिकार गाजविणारे हे राजश्री कोण? या प्रश्नावरून मि. नार्डो यांच्या लेखांतील मुद्याचा खुलासा होतो. युरोपांत वृत्तपत्रांना 'चवथी सत्ता' मानण्याचा किंवा तसें ह्मणण्याचा प्रघात पडला, याला अनुलक्षून आपल्या ठरलेल्या पद्धतीप्रमाणें, त्यांनीं त्यांतील असत्य चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणताही प्रकार वाजवीपेक्षां जास्त झाला ह्मणजे प्रतिक्रिया देखील तितक्याच कमालीपर्यंत विरुद्ध दिशेला नेऊन पोहोंचविण्याकडे कांहीं विचारकर्त्यांचा कल असतो. या प्रवृत्तीचा दोष कांहीं अंशीं मनुष्यप्राण्याच्या विलक्षण आत्मविश्वासाकडे आहे. ज्या विचारांवर त्यांची करडी नजर असते, ते, तो जितके जास्त चुकीचे समजतो त्या मानानें विरुद्ध दिशेला आपले विचार नेण्यांतच आपल्या विचारांच्या शुद्धीची आणि सत्यत्वाची आशा आहे, असा ग्रह या प्रकारच्या मनुष्यांचा झालेला असतो. मि. नार्डो यांच्या लेखाचें अशा रीतीनें निरीक्षण केलें ह्मणजे त्यांच्या हातून झालेले प्रमाद वजा होऊन कांहीं तरी ग्राह्यांश उरतो. मुद्रण स्वातंत्र्याविषयीं लोक नेहमीं जागरुक असतात व त्यावरून त्यांचें लोककल्याणकारित्व सिद्ध होतें, असें त्यांनीं स्वतःच कबूल केलेलें आहे. मात्र लोकमताचें प्रतिपादन करण्याचें सोंग वृत्तपत्रें आणतात व त्यामुळें राजसत्ताधीशांवर त्यांचा विशेष पगडा बसतो, हें त्यांना सहन न होऊन त्यांनीं वृत्तपत्रांवर शस्त्र उचललें आहे, त्यांचा हेतु येवढेंच स्थापित करण्याचा आहेसा दिसतो कीं 'वृत्तपत्रमत ह्मणजे समाजमत हें समीकरण अबाधित नाहीं,' 'समाजाच्या नांवावर आपली खाजगीं मतें मिरवून त्यांस नाहक महत्व देऊं पहाणारांचा बंदोबस्त करण्याचा अधिकार समाजास आहे' आणि तो अधिकार समाजानें बजावणें ह्मणजे 'व्यक्तीचें मत व व्यक्तीसमूहाचें मत यांतील भेद तात्काळ कळण्या इतकें सुशिक्षण व सारासारविचारशक्ती सर्व वाचक वर्गास प्राप्त' होईपर्यंत 'वृत्तपत्रांवर कायद्याची माफक देखरेख असणें, न्याय्य व अवश्यक आहे.' सारांश बहुजन समाजाच्या विरुद्ध मतें प्रतिपादन करणाऱ्याला वर्तमानपत्रद्वारा तसें करण्याला वाव मिळूं नये. मि. नार्डो यांनीं अशा लेखकांना पुस्तकद्वारा जगापुढें आपलीं मतें मांडण्याची सवलत ठेवण्याची सूचना केली आहे.

आतां पर्यंत मि. नार्डो यांची चुकीची तर्कपद्धति व त्यांचे एकतर्फी सिद्धांत यांची ओळख वाचकांस करून दिली. विविधज्ञान विस्ताराच्या संपादकांनीं अशा रीतीच्या विचार सरणीचा लेख अशा आणीबाणीच्या प्रसंगीं पुढें आणल्यामुळें त्यांना मनाई हुकूम देण्याचा आमचा मानस नाहीं, किंबहुना त्यांचे हेतु पवित्र आहेत असें धरून चालून आह्मी या लेखांतील विचारसरणांतील असत्यत्व दाखविण्यास उद्युक्त झालेलों आहों. मि. नार्डो यांची विचार पद्धति आमच्या देशांत ग्राह्य मानली जावी अशी आमची बिलकूल शिफारस नाहीं. आणि यापुढें दिलेल्या करणांचा विचार करून विविधज्ञानविस्ताराच्या संपादकांचें मत आमचे प्रमाणेंच होईल असा आह्माला भरंवसा आहे. वृतपत्रें लोकमताचें निदर्शक होत, सबब त्यांच्या वजनामुळें कायदेकानू बदलले किंवा तयार झाले पाहिजेत हें मि. नार्डो यांच्या प्रमाणें आह्मालाही सर्वस्वी कबूल नाहीं. आमच्या मनांत मि. नार्डो यांच्या मताशीं विरोध आहे तो असा कीं ज्या देशांतील वृत्तपत्रांचें उदाहरण त्यांनीं घेतलें आहे तेथील परिस्थितीकडे पहातां, फक्त वृत्तपत्रांच्या लेखांमुळेंच सर्व कायदेकानूंची ह्मणजे राजकीय व्यवहाराची घडामोड होतें हें ह्मणणें चुकीचें आहे. वर्तमान पत्रांतले लेख जेथें सरकारावर छाप पाडूं शकतात तेथें केवळ अधिकारी वर्गाच्या इच्छेखेरीज आणखी कोणी तरी संस्था किंवा व्यक्ती राजकरणारावर कमी जास्त प्रमाणानें सत्ता चालवूं शकते असें प्रथम कबूल केलें पाहिजे. ह्मणजे प्रस्थापित सत्तेशीं प्रसंगीं विरोध धरणारी सत्ता कायद्यानें प्रतिबंधित नसून समाजाचे हिताचे इच्छेनें तिची अंमलबजावणी होऊं शकते. यावरून हें उघड होतें कीं जेथें अशी स्थिति आहे तेथील स्थापित सत्तेचे प्रतिनिधि किंवा चालक आपणाव्यतिरिक्त स्वसमाजांतर्गत दुसऱ्या एखाद्या सत्तेशीं अनुदारपणाचें वर्तन करीत नाहींत. शुद्ध स्वरूपाच्या राजसत्तेंतील हें प्रधान तत्व आहे आणि त्याचा अंगिकार अनादिकाळापासून अनेक प्रसंगीं झालेला आहे. अशाच तत्वावर चाललेली सत्ता शुद्ध ह्मणून मानण्याकडे पूर्वींची प्रवृत्ति होती व यापुढेंही या धोरणावर जगाचा राजकीय व्यवहार रहाण्याचीं लक्षणें दिसत आहेत. हें त्रिकाल बाधित तत्व आहे हें निश्चित आहे. त्याला इश्वरी न्यायाची मंजुरी आहे, किंबहुना इश्वरी इच्छा फक्त अशीच आहे असें मानण्याकडे आजपर्यंतच्या सर्व विचारी पुरुषांचा कल आहे व या पुढच्या विचारकर्त्यांचा कल त्याच मार्गानें रहाण्याचीं शुभ चिन्हें दिसत आहेत. जर कोठें या विचाराला मान मिळाला नसेल तर तो आमच्या हिंदु विचारपद्धतींप्रमाणें तामसी वृत्तीचा अधिक परिणाम असून अंती सात्विक विचारांचा, ह्मणजे वर सांगितलेल्या सत्याचाच जय व्हावयाचा आहे. समाजहिताचें रक्षण करण्याचे कामीं प्रस्थापित सत्तेला मदत करणारी सत्ता ह्मणजे समाज मत होय हें निर्विवाद आहे. मि. नार्डो यांना हें लोकमत वजनदार होऊं शकावें हें तत्व मान्य आहे. मात्र वर्तमानपत्रांनीं आपण लोकमत आहों असें ह्मणूं नयें किंवा तसें त्यांनीं ह्मटल्यास त्यांचें कोणी ऐकूं नये, असें त्यांचें मत आहे. हें त्यांचें मत प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें वर्तमानपत्रांच्या वाजवीपेक्षां जास्त वजनामुळें उत्पन्न झालेल्या तिटकाऱ्याचें फळ आहे. येवढेंच आह्मांस सांगावयाचें आहे. मि. नार्डो यांचा हेतु अगदीं शुद्ध दिसतो यांत शंका नाहीं. त्यांनीं सुचविलेला उपाय मात्र प्रसंगीं न्यायाशीं विरुद्ध जाणारा असल्यामुळें त्याच्या विषयीं असंमति दर्शवावयाची आहे. युरोपांत वृत्तपत्रें ह्मणजे 'कर्तुमकर्तु' शक्तिमान होऊन बसल्याचा काळ मि. नार्डो यांनीं आपलें पुस्तक लिहिलें तेव्हां असला तरी इंग्लंडांत तो काळ बऱ्याच अंशानें आतां गेला आहे. असें कलकत्याचें 'एंपायर' पत्राचे संपादक मि. फ्रेजर ब्लेअर यांनीं एकदीड वर्षापूर्वीं एका लेखांत सांगितलेलें आह्मास आठवतें. ही स्थिति जरी खरी असेल किंवा नसेल, पण कालांतरानें व प्रयत्नांतीं तशी स्थिति येणार हें निश्चित आहे. येथें मुद्दा येवढाच आहे कीं, वृतपत्रांना फाजील महत्व आलें ह्मणजे सरकारच्या कृतीवर त्याचा वाजवीपेक्षां जास्त परिणाम झालातर त्याचा कायद्यानें प्रतिकार करावा किंवा काय? या प्रश्नाचें उत्तर भिरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळें येईल येवढें अगोदर बजावून ठेवणें आह्मांस इष्ट वाटतें. ज्या देशांतील सरकार व समाज यांचें कोणत्याही कारणानें हितैक्य आहे व जेथें लोकमताचा परिणाम समाजहिताचें रक्षणाचे कामीं होऊं शकतो अशा ठिकाणीं वृत्तपत्रासंबंधानें क्षिति बाळगण्याचें मुळींच कारण नाही. वर्तमानपत्रांचें वजन लोकमत ह्मणून सरकारावर पडावें किंवा कसें हा प्रश्न अशा रीतीनें सोडवितां येतो कीं जेथें समाजांतील व्यक्तींचीं किंवा व्यक्तिसमूहाचीं प्रत्यक्ष मतें घेण्यास वाव आहे व त्या रीतीनेंच राज कारण चालूं आहे तेथें लोकमताधिक्याशीं वृत्तपत्रांचें मत पडताळून पहातां येणें शक्य आहे. समाजाच्या निरनिराळ्या पंथांचीं निरनिराळीं पत्रें असतात. आपल्या पंथाच्या विचाराला सर्वस्वी चिकटून जरी वर्तमानपत्रें नेहमीं रहात नाहींत असें घटकाभर मानलें तरी त्यांची ती विसंगतता नसून आपल्याआपल्या पंथाच्या किंवा विचारसरणीच्या ठराविक कार्यक्रमांतील पुढच्या एखाद्या मजलेवर तीं मधून मधून जात असतात. आपल्या ठराविक तत्वांना सोडून मागें फिरण्यानें त्यांचें वजन राहत नाहीं. अशा प्रकारानें हवी तेव्हां आपलीं तत्वें बदलणारीं पत्रें लोकाश्रयाला किंवा वजनाला पात्र होतात असें कोणीही दाखवूं शकणार नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं आपआपल्या ठराविक विचार सरणीला सुसंगत अशा रीतीनें आपलीं मतें ह्मणजे आपली विचारणी प्रत्येक प्रसंगीं व प्रत्येक बाबतींत प्रगट करण्याची खबरदारी घेणारीं आणि लोकादरास पात्र झालेलीं

न्हे या दोघांनाहीं भावी काळांत उपयुक्त झाल्यावांचून रहावयाचा नाहीं. लालाजींना व्यर्थ हदपार केले असा अद्याप लोकांचा समज आहे आणि त्याचे विरुद्ध सप्रमाण पुरावा सिद्ध होईपर्यंत तो तसाच कायम रहाणार आहे हें उघड आहे. लालाजींनीं आपल्या वरील प्रसंगांत दाखविलेले मनोधैर्य अत्यंत प्रशंसनीय होते. हतबुद्ध करणाऱ्या अशा प्रसंगांतून पार पडल्यावर मुद्दां स्वदेश व स्वसमाज यांच्या सेवेचा त्यांचा व्यवसाय उत्साहानें व एक निष्ठेनें चालू आहे; या वरून त्यांच्याविषयीं आदर व पूज्य बुद्धी बाळगणाऱ्यांनीं पुष्कळ शिकावयाजोगें आहे.

---


# वऱ्हाडसमाचार

आषाढ शुद्ध १५ शके १८३०


## वृत्तपत्रांची मुस्कुटदाबी.

वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा हिंदुस्थान सरकारचे कायदेकौन्सिल थोड्याच अवधींत प्रसवणार असें लॉर्ड मिंटो यांच्या उद्गारावरून स्पष्ट झालेलें आहे. अशा वेळीं 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्तकांत मॅक्स नार्डो यांच्या 'कॉन्व्हेन्शनल लाईज' नांवाच्या ग्रंथांतील एका भागाच्या आधारानें रा. मंगेश शिवाजी तेलंग बी. ए. एल एल बी यांनीं लिहिलेला एक लेख 'मुद्रण स्वातंत्र्याची मिमांसा या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला आहे. युरोपांतील कृत्रिम व्यवहाराच्या अतिरेकाला विटून मि. नार्डो यांनीं आपला ग्रंथ लिहिलेला आहे व त्याला नांव देतांना आपला हेतु व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. रुढीमुळें जे कांहीं प्रकार भाषेंत किंवा व्यावहारांत शिरलेले आहेत ते दाखवून देऊन, त्यांची विल्हेवाट कशी लावावयाची ते सुचविण्याचा प्रयत्न मि. नार्डो यांनीं केला आहे; पण त्यांची पद्धति दीर्घकालच्या अनुभावानें शास्त्रज्ञांकडून अप्रशस्त ठरलेल्या तर्क पद्धतीवर रचलेली असल्यामुळें, प्रसगीं त्यांचे हातून आपल्या ठरीव तत्वाचें स्थापनेसाठीं सत्याचा अपलाप, किंवा अतिशयोक्ति इत्यादि प्रकारांनीं एक प्रकारच्या असत्याचा आश्रय असे निंद्य प्रकार झाले आहेत. हे प्रकार कां झाले हें कोणीही विचारी मनुष्य जाणूं शकेल. व्यवहारांतील कांहीं विशेष ठोबळ उदाहरणांवरून, व्यथित झालेल्या मनानें एक सिद्धांत रचावयाचा व तो अबाधित रहावा ह्मणून त्याला जुळतील अशा रीतीनें उदाहरणें तयार करावयाचीं. जो मनस्वी विचारकर्त्यांच्या अंगच्या दुर्गुणांपैकी एक प्रकार, त्याला मि. नार्डो हे बळी पडलेले आहेत. त्यांचें सुदैव इतकेंच कीं, वृत्तपत्रें अशाच मार्गानें जाऊन समाजाचे मनांत खळबळ उत्पन्न करतात ह्मणून त्यांना निर्बंध घालून देण्याचा कायदा त्यांच्या सूचनेप्रमाणें झालेला असतां, तरी प्रस्तुत लेख त्यांनीं वर्तमानपत्रांत न छापतां स्वतंत्र पुस्तकरूपानें काढला आहे; पुस्तकांत कोणत्याही प्रकारचे विचार प्रसिद्ध होण्याला मनाई नसावी असें खुद मि. नार्डो यांचें मत होतें; आणि निदान हा दुसरा भाग तरी युरोपांतील सरकारांनीं अद्यापपर्यंत मान्य केलेला आहे. 'कोणतीही राजकीय सुधारणा, कसलेही कायदेकानू, वृत्तपत्रांच्या अनुमतिशिवाय व साहाय्याशिवाय प्रजेवर लादणें' युरोपांतील कांहीं 'सरकारांस अशक्य झालें आहे;' याला कारण त्यांचें समाजावरील वजन आहे; लोक मताचें काम वृत्तपत्रें बजावतात ह्मणूनच त्यांची शक्ति 'कर्तृ व कर्तृं' अशी झाली आहे; ती न्याय्य नाहीं; अशा रीतीनें विचार करून मि. नार्डो ह्मणतात, 'लोकमताचा अत्युच्च अधिकार गाजविणारे हे राजश्री कोण ? या प्रश्नावरून मि. नार्डो यांच्या लेखांतील मुद्याचा खुलासा होतो. युरोपांत वृत्तपत्रांना 'चवथीं सत्ता' मानण्याचा किंवा तसें ह्मणण्याचा प्रघात पडला, याला अनुलक्षून आपल्या ठरलेल्या पद्धतीप्रमाणें, त्यांनीं त्यांतील असत्य चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणताही प्रकार बाजवीपेक्षां जास्त झाला ह्मणजे प्रतिक्रिया देखील तितक्याच कमालीपर्यंत विरुद्ध दिशेला नेऊन पोहोंचविण्याकडे कांहीं विचारकर्त्यांचा कल असतो. या प्रवृत्तीचा दोष कांहीं अंशीं मनुष्यप्राण्याच्या विलक्षण आत्मविश्वासाकडे आहे. ज्या विचारांवर त्यांची करडी नजर असते, ते, तो जितके जास्त चुकीचे समजतो त्या मानानें विरुद्ध दिशेला आपले विचार नेण्यांतच आपल्या विचारांच्या शुद्धीची आणि सत्यत्वाची आशा आहे, असा ग्रह या प्रकारच्या मनुष्यांचा झालेला असतो. मि. नार्डो यांच्या लेखाचें अशा रीतीनें निरीक्षण केलें ह्मणजे त्यांच्या हातून झालेले प्रमाद वजा होऊन कांहीं तरी ग्राह्यांश उरतो. मुद्रण स्वातंत्र्याविषयीं लोक नेहमीं जागरुक असतात व त्यावरून त्यांचें लोककल्याणकारित्व सिद्ध होतें, असें त्यांनीं स्वतःच कबूल केलेलें आहे. मात्र लोकमताचें प्रतिपादन करण्याचें सोंग वृत्तपत्रें आणतात व त्यामुळें राजसत्ताधीशांवर त्यांचा विशेष पगडा बसतो, हें त्यांना सहन न होऊन त्यांनीं वृत्तपत्रांवर शस्त्र उचललें आहे, त्यांचा हेतु येवढेंच स्थापित करण्याचा आहेसा दिसतो कीं 'वृत्तपत्रमत ह्मणजे समाजमत हें समीकरण अबाधित नाहीं,' 'समाजाच्या नांवावर आपली खाजगी मतें मिरवून त्यांस नाहक महत्व देऊं पहाणारांचा बंदोबस्त करण्याचा अधिकार समाजास आहे' आणि तो अधिकार समाजानें बजावणें ह्मणजे 'व्यक्तीचें मत व व्यक्तिसमूहाचें मत यांतील भेद तात्काळ कळण्या इतकें सुशिक्षण व सारासारविचारशक्ती सर्व वाचक वर्गास प्राप्त' होईपर्यंत 'वृत्तपत्रांवर कायद्याची माफक देखरेख असणें, न्याय्य व अवश्यक आहे.' सारांश बहुजन समाजाच्या विरुद्ध मतें प्रतिपादन करणाऱ्याला वर्तमानपत्रद्वारा तसें करण्याला वाव मिळूं नये. मि. नार्डो यांनीं अशा लेखकांना पुस्तकद्वारा जगापुढें आपलीं मतें मांडण्याची सवलत ठेवण्याची सूचना केली आहे.

आतां पर्यंत मि. नार्डो यांची चुकीची तर्कपद्धति व त्यांचे एकतर्फी सिद्धांत यांची ओळख वाचकांस करून दिली. विविधज्ञान विस्ताराच्या संपादकांनीं अशा रीतीच्या विचार सरणीचा लेख अशा आणीबाणीच्या प्रसंगीं पुढें आणल्यामुळें त्यांना मनाई हुकूम देण्याचा आमचा मानस नाहीं, किंबहुना त्यांचे हेतु पवित्र आहेत असें धरून चालून आह्मी या लेखांतील विचारसरणांतील असत्यत्व दाखविण्यास उद्युक्त झालेलों आहों. मि. नार्डो यांची विचार पद्धति आमच्या देशांत ग्राह्य मानली जावी अशी आमची बिलकूल शिफारस नाहीं. आणि यापुढें दिलेल्या कारणांचा विचार करून विविधज्ञानविस्ताराच्या संपादकांचें मत आमचे प्रमाणेंच होईल असा आह्माला भरंवसा आहे. वृत्तपत्रें लोकमताचें निदर्शक होत, सबब त्यांच्या वजनामुळें कायदेकानू बदलले किंवा तयार झाले पाहिजेत हें मि. नार्डो यांच्या प्रमाणें आह्मालाही सर्वस्वी कबूल नाहीं. आमच्या मनांत मि. नार्डो यांच्या मताशीं विरोध आहे तो असा कीं ज्या देशांतील वृत्तपत्रांचें उदाहरण त्यांनीं घेतलें आहे तेथील परिस्थितीकडे पहातां, फक्त वृत्तपत्रांच्या लेखांमुळेंच सर्व कायदेकानूंची ह्मणजे राजकीय व्यवहाराची घडामोड होते हें ह्मणणें चुकीचें आहे. वर्तमान पत्रांतले लेख जेथें सरकारावर छाप पाडूं शकतात तेथें केवळ अधिकारी वर्गाच्या इच्छेखेरीज आणखी कोणी तरी संस्था किंवा व्यक्ती राजकरणावर कमी जास्त प्रमाणानें सत्ता चालवूं शकते असें प्रथम कबूल केलें पाहिजे. ह्मणजे प्रस्थापित सत्तेशीं प्रसंगीं विरोध धरणारी सत्ता कायद्यानें प्रतिबंधित नसून समाजाचे हिताचे इच्छेनें तिची अंमलबजावणी होऊं शकते. यावरून हें उघड होतें कीं जेथें अशी स्थिति आहे तेथील स्थापित सत्तेचे प्रतिनिधि किंवा चालक आपणाव्यतिरिक्त स्वसमाजांतर्गत दुसऱ्या एखाद्या सत्तेशीं अनुदारपणाचें वर्तन करीत नाहींत. शुद्ध स्वरूपाच्या राजसत्तेंतील हें प्रधान तत्व आहे आणि त्याचा अंगिकार अनादिकाळापासून अनेक प्रसंगीं झालेला आहे. अशाच तत्वावर चाललेली सत्ता शुद्ध ह्मणून मानण्याकडे पूर्वीची प्रवृत्ति होती व यापुढेंही या धोरणावर जगाचा राजकीय व्यवहार रहाण्याचीं लक्षणें दिसत आहेत. हें त्रिकाल बाधित तत्व आहे हें निश्चित आहे. त्याला ईश्वरी न्यायाची मंजुरी आहे, किंबहुना ईश्वरी इच्छा फक्त अशीच आहे असें मानण्याकडे आजपर्यंतच्या सर्व विचारी पुरुषांचा कल आहे व या पुढच्या विचारकर्त्यांचा कल त्याच मार्गानें रहाण्याचीं शुभ चिन्हें दिसत आहेत. जर कोठें या विचाराला मान मिळाला नसेल तर तो आमच्या हिंदु विचारपद्धतींप्रमाणें तामसी वृत्तीचा अधिक परिणाम असून अंती सात्विक विचारांचा, ह्मणजे वर सांगितलेल्या सत्याचाच जय व्हावयाचा आहे. समाजहिताचें रक्षण करण्याचे कामीं प्रस्थापित सत्तेला मदत करणारी सत्ता ह्मणजे समाज मत होय हें निर्विवाद आहे. मि. नार्डो यांना हें लोकमत वजनदार होऊं शकावें हें तत्व मान्य आहे. मात्र वर्तमानपत्रांनीं आपण लोकमत आहों असें ह्मणूं नये किंवा तसें त्यांनीं ह्मटल्यास त्यांचें कोणी ऐकूं नये, असें त्यांचें मत आहे. हें त्यांचें मत प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें वर्तमानपत्रांच्या बाजवीपेक्षां जास्त वजनामुळें उत्पन्न झालेल्या तिटकाऱ्याचें फळ आहे. येवढेंच आह्मांस सांगावयाचें आहे. मि. नार्डो यांचा हेतु अगदीं शुद्ध दिसतो यांत शंका नाहीं. त्यांनीं सुचविलेला उपाय मात्र प्रसंगीं न्यायाशीं विरुद्ध जाणारा असल्यामुळें त्याच्या विषयीं असंमति दर्शवावयाची आहे. युरोपांत वृत्तपत्रें ह्मणजे 'कर्तुमकर्तु' शक्तिमान होऊन बसल्याचा काळ मि. नार्डो यांनीं आपलें पुस्तक लिहिलें तेव्हां असला तरी इंग्लंडांत तो काळ बऱ्याच अंशानें आतां गेला आहे. असें कलकत्याचें 'एंपायर' पत्राचे संपादक मि. फ्रेजर ब्लेअर यांनीं एकदीड वर्षापूर्वी एका लेखांत सांगितलेलें आह्मांस आठवतें. ही स्थिति जरी खरी असेल किंवा नसेल, पण कालांतरानें व प्रयत्नांतीं तशी स्थिति येणार हें निश्चित आहे. येथें मुद्दा येवढाच आहे कीं, वृत्तपत्रांना फाजील महत्व आलें ह्मणजे सरकारच्या कृतीवर त्याचा बाजवीपेक्षां जास्त परिणाम झाल्यास त्याचा कायद्यानें प्रतिकार करावा किंवा काय? या प्रश्नाचें उत्तर निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळें येईल येवढें अगोदर बजावून ठेवणें आह्मांस इष्ट वाटतें. ज्या देशांतील सरकार व समाज यांचें कोणत्याही कारणानें हितैक्य आहे व जेथें लोकमताचा परिणाम समाजहिताचें रक्षणाचे कामीं होऊं शकतो अशा ठिकाणीं वृत्तपत्रांसंबंधानें क्षिति बाळगण्याचें मुळींच कारण नाही. वर्तमानपत्रांचें वजन लोकमत ह्मणून सरकारावर पडावें किंवा कसें हा प्रश्न अशा रीतीनें सोडवितां येतो कीं जेथें समाजांतील व्यक्तींचीं किंवा व्यक्तिसमूहाचीं प्रत्यक्ष मतें घेण्यास वाव आहे व त्या रीतीनेंच राज कारण चालूं आहे तेथें लोकमताविरुद्धाशीं वृत्तपत्रांचें मत पडताळून पहातां येणें शक्य आहे. समाजाच्या निरनिराळ्या पंथांचीं निरनिराळीं पत्रें असतात. आपल्या पंथाच्या विचाराला सर्वस्वी चिकटून जरी वर्तमानपत्रें नेहमीं रहात नाहींत असें घटकाभर मानलें तरी त्यांची ती विसंगतता नसून आपल्याआपल्या पंथाच्या किंवा विचारसरणीच्या ठराविक कार्यक्रमांतील पुढच्या एखाद्या मजलेवर तीं मधून मधून जात असतात. आपल्या ठराविक तत्वांना सोडून मागें फिरण्यानें त्यांचें वजन राहत नाहीं. अशा प्रकारानें हवी तेव्हां आपलीं तत्वें बदलणारीं पत्रें लोकाश्रयाला किंवा वजनाला पात्र होतात असें कोणीही दाखवूं शकणार नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं आपआपल्या ठराविक विचार सरणीला सुसंगत अशा रीतीनें आपलीं मतें ह्मणजे आपली विचारणी प्रत्येक प्रसंगीं व प्रत्येक बाबतींत प्रगट करण्याची खबरदारी घेणारीं आणि लोकादरास पात्र झालेलीं

पत्रें ह्मणजे लोकमताचें प्रतिबिंब नव्हे असें कसें मानतां येईल. मात्र कोणत्याही महत्वाच्या बाबींत ह्मणजे राजकारणांत कोणतीही महत्वाची अशी नवी दिशा धरतांना केवळ वृत्तपत्रांच्या मतांवर अवलंबून राहणें योग्य होणार नाहीं. न्याय सुद्धां कोणाही एका व्यक्तीची साक्ष त्याला पुष्टी देणाऱ्याच्या पुराव्याखेरीज ग्राह्य धरीत नाहींत. लोकमतनिदर्शक आणि वृत्तप्रसारक अशी संस्था पूर्वींच्या राजांच्या हातून त्यांच्यापेक्षां जास्त कुशल, बुद्धिमान व विचारी अशा व्यक्तीच्या हातीं गेल्यामुळें तिचे चालकांवरची जबाबदारी कायद्यानें दाद्यविलेलीच आहे. अगदीं ईश्वरी न्यायाच्या ह्मणजे नीतीच्या आधारावर जसे इतर अनिष्ट प्रकार गुन्हा केले जातात त्याचप्रमाणें वृत्तपत्रांनाही कायद्यानें अगोदरच योग्य तितकी बंदी झालेली असते. त्या पलीकडे जाऊन बहुजनसमाजाच्या प्रस्तुतकाळीं असलेल्या कल्पनांशीं विरुद्ध मत वर्तमानपत्रांतून प्रतिपादणाऱ्या लेखकाला कायद्यानें बंदी करणें न्याय्य ह्मणतां यावयाचें नाहीं. मुद्रण स्वातंत्र्य ज्या कारणाकरितां न्याय्य आहे त्याच कारणाकरितां केवळ लोकमताचा आव घालणारे कांहीं लेखक बहुजनसमाजाच्या विरुद्ध मतें प्रतिपादितात ह्मणून त्यांना तसें करण्याला मोकळीक ठेवणें रास्त आहे. अशी मोकळीक ठेवल्यानें कांहीं प्रसंगीं समाजांत घोटाळा उत्पन्न होईल हें खरें पण ती मोकळीक बंद ठेवल्यानें समाजास घटकोघटकीं घडणाऱ्या वरून पदोपदीं योग्य वळण लावीत जाणें, एका ठराविक आणि ग्राह्य विचारसरणीप्रमाणें प्रत्येक प्रसंगाचें निरीक्षण करणें आणि समाजाच्या मनःस्थितीचें दिग्दर्शन करणें या गोष्टी कोणाही वर्तमान पत्रकर्त्याला नीट रीतीनें चालवितां यावयाच्या नाहींत. वाईटांचा पाडाव करतांना चांगलेंही सापडले जातील. चांगले व वाईट हें ठरविण्याचा अधिकार तरी कोणाच्या हातीं असावयाचा हा प्रश्नच आहे. एकंदर मुद्रणस्वातंत्र्याला आळा न घालण्यासंबंधानें मि. नार्ली यांनीं जीं प्रमाणें आणि ज्या सबबी पुढें आणल्या आहेत त्या वर्तमानपत्राच्या बाबतींत देखील अवश्य लागू धरल्या पाहिजेत. दहा दुष्ट शिक्षेवांचून सुटले तरी हरकत नाहीं, पण एक सुष्ट अन्यायानें शिक्षेच्या कच्याट्यांत सांपडूं नये हें न्यायाचें प्रसिद्ध तत्व आहे त्याचा अवलंब येथें जरूर केला पाहिजे.

## राजद्रोहविध्वंसक सत्र.

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थानाच्या तीन भागांत राजद्रोहाचे आरोपावरून तिघा गृहस्थांस शिक्षा होऊन पीनलकोडाचें संरक्षण करण्याचा सरकारचा हेतु सिद्धीस गेला. तिनिवेळीं येथील स्पेशल जजसाहेबांना राजद्रोहाच्या आरोपाला जन्मठेप किंवा निदान दहा वर्षें काळेपाण्याचीच शिक्षा अवश्य वाटली. अलाहबादेच्या न्यायाधीशांनीं एकंदर साडेचार वर्षें कैदेची शिक्षा होणें पुरेसें आहे असें दर्शविलें. व मुंबई हायकोर्टाच्या दृष्टीनें सवावर्ष सक्तमजुरीची शिक्षा राजद्रोहाच्या आरोपावरून दल व भिन्न भिन्न जातींत द्वेष उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाबद्दल चार महिने सक्तमजुरची शिक्षा देणें ह्मणजे आरोपीवर मोठी रहेमनजर केली, असें झालें. पहिल्या दोन न्यायाधीशांनीं ज्यांना शिक्षा फर्माविली त्या गृहस्थांवर स्वदेशी चळवळीवरून किटाळ आलें असून तिसऱ्या गृहस्थांनीं सरकारचें सध्यांचें धोरण कसें चुकत आहे हें दाखविण्याचा प्रयत्न केल्यामुळें अखेरीस ने कायद्याच्या कचाट्यांत सांपडले आहेत. मि. चिदंबर पिल्ले, मि. सुब्रह्मण्यं शिव 'उर्दु स्वराज्य' पत्राचे संपादक व रा. शिवरामपंत परांजपे हे चौघे गृहस्थ अशा रीतीनें काळेपाण्यापासून एकोणीस महिन्याच्या मुदतीपर्यंत अधिक कमी मानानें स्वदेश व स्वसमाज यांच्या सेवेला अंतरले आहेत. कोणत्याही महत्कार्यांत वेळोंवेळीं स्वसामर्थ्यानुसार व परिस्थित्यनुसार झटणाऱ्या विभूतींच्या थोरवीच्या बाबतींत प्रत लावीत बसण्याचें कार्य इतिहासकाराचें असतें. तात्कालिक वाङ्मयांत त्या संबंधानें निश्चयात्मक विधान करणें अयोग्य नसलें तरी अप्रस्तुत होतें यांत संशय नाहीं. प्रस्थापित सत्तेच्या नियमांचे दृष्टीनें जे पुरुष समाजस्वास्थ्यविघातक ठरले ते पुढें मागें भिन्न परिस्थितींत कांहीं निराळ्या स्वरूपांत ओळखले जाण्याचा अतिशय संभव आहे. तशांत निसर्गाशीं विरुद्ध असलेल्या परिस्थितींत ज्यांचेवर अशा प्रकारचे प्रसंग येतात त्यांचे संबंधानें अमुकच एका प्रकारचा शेरा आज सर्वांनीं मारला पाहिजे असें ह्मणणें निवळ जुलूम होईल. अशा प्रकारची अपेक्षा करण्याचा अधिकार कोणासही नाहीं, आणि तो आपल्याला आहे असें कोणी प्रतिपादूं लागलें तरी त्याची अंमलबजावणी होणें अशक्य आहे. इंडियन पीनल कोडांत राजद्रोह करणाराला शिक्षा सांगितलेली आहे. आजन्म स्वातंत्र्यास मुकण्यापर्यंत तिची मर्यादा आहे. या आरोपावरून चौकशी करितां न्यायासनासमोर आलेल्या व्यक्तींना दोषी ठरविण्याचा कल कोणाना कोणा तरी व्यक्तीचा किंवा व्यक्तिसमूहाचा होणें शक्य आहे. गुन्ह्याची व्याख्या अपुरी किंवा अडचणीची वाटल्यास ती दुरुस्त करण्याला मार्ग मोकळा आहे, तों पर्यंत राजद्रोहाचे खटले व त्यांत आरोपींना शिक्षा हे प्रकार कधींना कधीं घडणारच. त्याबद्दल वैषम्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. किंबहुना कोणत्याहि परिस्थितींत राजसत्ता अस्तित्वांत असली तरी या प्रकारांपासून ती अलिप्त राहूं शकावयाची नाहीं. तात्विक रीत्या राजशास्त्रपद्धतीचा हा अपरिहार्य असा मार्ग आहे, हें सर्वांना कबूल करावें लागेल. ह्मणून त्या रीतीनें प्रस्तुतच्या प्रकारांविषयीं भिन्नमत प्रदर्शित करणें वेडगळ पणाचें होणार आहे. पण तत्वाचा भाग बाजूस ठेवला तरी त्याच्या व्यावहारिक स्वरूपासंबंधानें मात्र तसेंच सिद्धांतमय मतैक्य असणें संभवनीय नाहीं, येवढें मात्र खास ह्मणता येतें.

## काळकर्त्यांची आहूति.

राजद्रोहासंबंधीं खटल्याच्या सत्रांत पुण्याचे 'काळ' कर्ते रा. रा. परांजपे यांची पडलेली आहूति अनेक कारणामुळें महत्वाची आहे. रा. परांजपे यांची लेखक या नात्यानें आधुनिक महाराष्ट्रांत फार वरची पायरी सुप्रसिद्ध आहे. महाराष्ट्रांतलि समाजाच्या राजकीय कल्पनांना स्वतंत्र वळण लावण्याचें सर्व श्रेय त्यांचेकडे येतें याबद्दल कोणी शंका घेऊं शकणार नाहीं. त्यांची सतेज लेखनशैली व विद्वत्तापूर्ण प्रगल्भ विचार यांचा समवायानें वाचकांचे व श्रोत्यांचे मनावर होणारा परिणाम विलक्षण असतो. हें महाराष्ट्रांतील कोणासही सांगण्याची वास्तविक जरूरच नाहीं. त्यांनीं आपल्यावरील खटल्याचे प्रसंगीं दाखविलेलें मनाचें स्थैर्य कशा प्रकारचें होतें, हें दुसऱ्या कोणाच्या दृष्टीनें पहाण्यापेक्षां, त्यांची चवकशी करणाऱ्या न्यायाधीशांच्या दृष्टीनें पहाण्यांत कांहीं विशेष आहे. आपण लिहिलेल्या लेखांतलि मर्म दुसऱ्या कोणासही यथार्थ समजावून सांगतां यावयाचें नाहीं हें जाणून असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं कायद्याच्या गुंतागुंतीच्या धरपकडींत पूर्ण निष्णात अशा सरकारी बॅरिस्टरांना तोंड देण्यास उभ्या राहिलेल्या गृहस्थाच्या विद्वत्तेबद्दल व त्याच्या विचारांच्या प्रगल्भतेबद्दल न्या. दावर यांनीं अत्यंत आश्चर्य प्रकट केलें नसतें तर आश्चर्य होतें. अशा थोर अधिकाराचा पुरुष केवळ गुन्हा करतांच गुन्हा करील हें अगदीं असंभवनीय असल्यामुळें किंबहुना रा. परांजपे यांच्या लेखांतील व भाषणांतील प्रत्येक शद्बाचा ठसा अंतःकरणावर उत्तम प्रकारचा उमटल्यामुळें, त्यांनीं केलें तें केवळ स्वदेशप्रेमामुळें केलें असें जुरींतील गृहस्थांचें बहुमत प्रकट होणें अपरिहार्य झालें. न्यायमंदिरांतील पंचांचा हा शिक्का पीनल कोडांतील कलमाला मात्र निःसंशय बाधक झाला असता; पण पिनल कोड हेतूचा प्रश्न जमेस धरीत नाहीं- त्याचा न्याय 'न कळतां पद अग्निवरी पडे, न करी दाह असें न कधीं घडे' अशा रीतीचा अगदीं निसर्गाच्याच न्यायाच्या बरोबरीचा आहे! या एकाच बाबतींत ग्राह्य झालेलें तत्व पिनल कोडांतील इतर गुन्ह्यांच्या संबंधानें ग्राह्य मानलेल्या तत्वाशीं अगदीं विरुद्ध आहे, हा भाग निराळा! रा. परांजपे यांच्या विषयीं जुरीची बहुमताची शिफारस व त्यांच्या स्वतःच्या अंगचे लोकोत्तर गुण या दोन्ही गोष्टी मान्य करणाऱ्या न्यायमूर्तींच्या तोंडांत मात्र सक्त मजुरीची शिक्षा अगदीं अनाठायीं दिसते निसर्गाचा न्याय, हा विद्वान् आणि हा अविद्वान् किंवा हा देवपूजेस जात होता व हा कांहीं निंद्य कार्यास जात होता असा भेद न करतां सरसकट सारखाच न्याय देतो, त्याप्रमाणें मात्र पिनल कोडाचा प्रतिनिसर्गस्वरूपी न्याय देणाऱ्या न्यायाधीशांनीं कां केलें नाहीं, यांचे स्पष्टीकरण एकाच रीतीनें होणें शक्य आहे. आणि तें हें कीं पिनल कोडांतील राजद्रोहासंबंधाच्या नियमानें निसर्गाची नक्कल करण्याची खटपट करणें अगदीं निंद्य आहे कारण तसें खरोखर करणें अशक्य आहे. न्या. दावर यांनीं अशा निस्पृहतेच्या सोंगामुळें ब्रिटिश न्यायदेवतेस मात्र अगदींच हास्यास्पद करून ठेवण्याचें पुण्य घेतलें आहे!

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—एकंदर पाऊस १४॥· इंच झाला आणि आतां कांहीं दिवस उघाडी झाल्या शिवाय गत्यंतर नाहीं. अद्याप रोगराई कांहीं नाहीं पण गावांत उंदीर पुष्कळ सैरावैरा फिरतांना दिसूं लागले आहेत.

रा. रा. सोराबजी शापुरजी ए. असि. क. उमरावती यास खामगांव सबडिव्हीजनवर बदलण्यांत आलें. खामगांवचे असि. क. रा. रा. पी. एस, पाठक आय. सी. एस असि. क. खामगांव यास हुसंगाबाद येथें डेप्युटी कमीशनरच्या जागीं बढतीवर पाठविण्यात आलें. रा. पाठक हे स्वभावानें सरळ, कामाला चोख व निर्भिड असे असून लोकांच्या महत्वाकांक्षांना ते आपल्या परीनें मदत करित असत ही विशेष आनंदाची गोष्ट होय.

गोपाळ काला—वे. शा. सं रा. रा. दांडेकर बोवा यांनीं येथील श्रीराम थिएटरांत सप्ताह कीर्तनांचा काल सायंकाळीं गोपाळ काला करून समाप्ति केली. हें गृहस्थ तरुण असून कीर्तनाच्या पौराणिक विषयामध्यें सांप्रतच्या स्थितीचा चित्रपट तुलनात्मक दृष्टीनें फार चांगला रेखाटतात. यांची योजना शक्ति विशेष गोड आहे.

स्कालरशिप — परदेशी जाऊन कला शिक्षण मिळविण्यासाठीं हिंदुस्थान सरकाराकडून दिल्या जाणाऱ्या स्कॉलरशिपांपैकीं एक स्कालरशिप सी. एस. श्री. नायडु यांना विणकाम शिकण्यासाठीं मिळाली आहे.

यंदाच्या म्यॅाट्रीक्युलेशन परीक्षेचा निकाल जो अलहाबाद युनिव्हर्सिटीनें दिला त्यांत वऱ्हाडचे खालील विद्यार्थी पसार झाले आहेत.

**उमरावती हायस्कूल**

सेकंड डिव्हिजन.

१ गणेश माधोराव टिकले, २ जनार्दन रामराव चांदुरकर, ३ शांताराम गोविंद कुळकर्णी ४ विनायक रघुनाथ टिपनीस.

थर्ड डिव्हिजन

१ अकबर मिया, २ अंबादास नारायण धांके ३ अनंत रघुनाथ तळवळकर ४ भिमराव पांडुरंग कुळकर्णी, ५ देवीदास विष्णु सहस्रभोजनी ६ काशिनाथ बाळकृष्ण वीरकर, ७ मोहन शामलाल माथुर, ८ नरहर केशव पेंडसे. ९ श्रीपाद सखाराम पेंढरकर १० उमेदसींग नारायणसींग जमादार.

**आकोला हायस्कूल**

सेकंड डिव्हिजन

१ कृष्णराव गणेश देशमूख, २ विष्णू मल्हार भालेराव.

थर्ड डिव्हिजन

१ अनंत दाजी टांकसाले, २ दयाल्दास गिंडुलाल चैाधरी ३ जगन्नाथ सखाराम गुर्जर ४ कृष्णाजी गोंदुराम मुवकल. ५ रामवर शिवदर्शल दिक्षीत, ६ विष्णु दामोदर सिंदेकर, ७ विश्वनाथ भास्कर दामले.

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्यां आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४-२-०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

नादे सखातू परोपदर्थ

# येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खातरीनें माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व वक्तशिर पाठवीलाजाईल. आह्मांस शेंकडों पत्र आलीं आहेत.

पत्ता:—

श्रीनीवास बाळकृष्ण होळे नरल
नं ७२ मर्चंट व कमिशन एजंट. येवलें.

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारांना भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबदल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.


बोर्डाच्या हुकूमावरून

**पी. सी. जोगळेकर आणि कंपनी म्या. एजंटस्**

नं. १३

दोन घड्याळें एकदम बोलावणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस साखळी सुद्धां शिशीस ।.



रासेकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडें व जे वग खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब. सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळाजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजूं लोकांनी अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदेश, प्रदर, धुपणी बाळंतरोग, पडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता:—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलीचे शाळेजवळ

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला

नं. ख. १


## नोटीस

वे. सखाराम वा लिंबाजी राजगोंड राहणार ताजनापेठ आकोला यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझ्याशीं लग्न लाविलें त्यास १ महिना झाला. लग्न झाल्यानंतर ८ दिवसांनीं मला ऋतुप्राप्त झाला आहे त्यानंतरचे अनुमानावरून तुह्मी मनुष्यत्वांत नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळें तुमच्याशीं माझा संसार सुखानें होण्याची आशा दिसत नाहीं. यासाठीं तुह्मांस ह्या नोटिशीनें कळवितें कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला फारकती देऊन मला दुसरा घरठाव करण्याची मोकळीक द्यावी. तसें न केल्यास ही नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझ्यावर हक्क दावा चालणार नाहीं. मी हल्लीं १०-१२ दिवसांपासून माझा मामा नागोजी राजगोंड यांजकडे राहत आहे. माझे आंगावर जे दागिने होते तेही तुह्मी काढून घेतले कळावें. ता. ३-७-०८ इ.

सही

रेंऊ मर्द सखाराम राजगोंड रा. आकोला नि. खु. हातची

नं. ग. ७५ बांगडी.

## नोटीस

नोटीस वेशमी— जानकाई जवजे अर्जुन जात कुणबी पाटील रहाणार नकाशी तालुके बाळापूर जिल्हा अकोला इला:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सख्खी चुलती आहेस. तुझे जवळ माझे चुलत्याचे नकाशी येथील मालकीचें शेत सर्व्हे नंबर २१ एकर गुंठे ९ आकार रुपये १० सालीम व मौजे नकाशी येथील शेत सर्व्हे नंबर ५३ एकरगुंठे २७ ८ आकार रुपये ४७ विहिरी सुद्धां यांतील एक शष्ठांश हिस्सा व त्याच गांवांतील राहतें घर धाब्याचें व गुरांची पागा अशी स्थावर जिनगी आहे. माझे चुलत्याला कोणाचें देणें नाहीं व नव्हतें व तुलाही कोणत्या गोष्टीची कमताई नाहीं. ही स्थावर जिनगी तूं अलीकडे स विक्रीस काढली आहे असें समजतें. तरी ही विक्री मजला बुडविण्याचे हेतुनें तूं दुसऱ्याचे सांगण्यावरून करीत आहेस. तुझा फक्त अन्नवस्त्राचा अधिकार आहे. जास्त नाहीं. करितां तुजला कळवितों कीं तूं ही जिनगी विकूं नयेस. विकल्यास ती विक्री मजला मंजूर नाहीं व मला लागूं नाहीं. कळावें. तारीख १ जुलै सन १९०८ इ०

सही

पुंडलीक वल्द शिताराम राहणार नकाशी ता०

नं. ग. ७६ बाळापूर द० रेघ.

## जाहिरात

सर्व लोकांस कळावें कीं, वर लिहिलेली जिनगी माझे चुलती जवळून कोणी गहाण अगर बक्षिस अगर विक्री अगर एक वर्षाचे पेक्षां जास्त पट्यानें घेऊं नयें घेतल्यास मी जबाबदार नाहीं. कारण माझी चुलती जिवंत आहे तो पावेतों तिचा खाण्याचा हक्क आहे. तिचे मरणानंतर त्या सर्व जिनगीचा मी मालक आहे कळावें. ता० १ जुलै सन १९०८ इ०

सही

पुंडलीक वल्द शिताराम राहणार नकाशी ता०

नं. ग. ७७ बाळापूर द० रेघ.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा संपती इब्राम पाटील मरण पावला त्याजला औरस मुलगा नसून बायको अज्ञान आहे. माझे घरांत पुरुष नसल्यानें मी गणपत वा आनंदा यांस दत्तक घेण्याचे विचारांत आहे. त्याप्रमाणें मयताचे नांवे असलेले सर्व्हे नंबराचें खातें गणपती वा आनंदा यांचें नांवें करून दिलें आहे पुढें त्यानें दत्तविधान न झाल्यामुळें व तो माझे जवळ राहून माझें संगोपन करीत नसल्यामुळें त्याचे नांवे पाटीलकी झाली नाहीं. हल्लीं ज्या अर्थी दत्तविधान झालें नाहीं त्या अर्थी त्याचा हाणजे गणपतीचा माझे जिनगींत कांहीं हक्क नाहीं. तरी तो आपण होऊन येण्यास व माझे घरीं राहून माझे व माझे घरांतील मंडळींचें संगोपन करण्यास तयार असल्यास माझी कांहीं हरकत नाहीं. व असें करण्याबद्दल त्यांस वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटीसही दिली होती परंतु त्यास आज दोन महिने झाले तरी उत्तर दिलें नाहीं किंवा माझे घरीं आला नाहीं सबब आह्मास आमचें संगोपन करण्यास कोणाची तरी खुशामत करणें जरूर आहे. सबब जाहिरातीनें कळविण्यांत येत आहे कीं मी माझे जिनगीची व्यवस्था वाटेल त्या रीतीनें आजपासून एक महिन्याचे आंत लाऊन आमचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त करून टाकीन ज्यांस कांहीं हरकत वगैरे दाखविणें असेल त्यांनीं १५ दिवसांचे आंत समक्ष येऊन अगर नोटिशीनें आह्मास कळविणें. जर असें न होईल तर आह्मी कोणतेही प्रकारें जबाबदार राहणार नाहीं अगर माझे जिनगींत कोणाचा हक्क राहणार नाहीं. माझी मी मुखत्यार आहे कळावें. तारीख १ जुलै सन १९०८ इ.

सही

शेवंती मर्द इब्राम पाटील इची नि.

नं. ग. ७८ बांगडी.

## जाहिरात

तेल्हारा ग्येनींग फ्याक्टरीचे भागीदार यांस:—

आपणा सर्वांस आज पत्र पाठवून हिशोब कळविला आहे. तसेंच आपण तारीख २०-७-०८ रोजीं सकाळीं ७ वाजतां कंपनीचे जागीं हजर राहून शिलकी सामानाची, वगैरे व्यवस्था न केल्यास त्या नंतर मी जबाबदार नाहीं असें कळविलें आहे. कोणास पत्र पावलें नाहीं ही सबब पुढें येऊं नये ह्मणून आज जाहीर करीत आहे. तारीख ७-७-०८ इ.

सही

नं. ग. ७९ गंगाधर गणेश

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन श्री अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें व रक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टीफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह पुराट परमा, दुष्टमैथुनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरिर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचत नाहीं ... त्यांस उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः–एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्राजनः–यानें पडळ, सारहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खर रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दाह तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूडः–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टीफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायन भस्में पाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनरा खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरु असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीत कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पोंवरपर्यंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरु होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे याउप्पर जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तर खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.



## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMBAY**

Chief Agency for C. P, Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,*by tmploying a portion of their annual income or profits in effecting life pole at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he di s early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over Life being so uncertain, the sooner a man makes hupuismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

. 2


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार

BERAR SAMACHAR

वर्ष ४२] अकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २० माहे जुलई सन १९०८ इसवी [अंक २७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........२ रुपय
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
इंग्लिशच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारि आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा ह्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाध्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट

नं ७३

### ❊ इकडे लक्ष द्या ! ❊

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठांडा, रंगीत पिठोरी १। रु० यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी शंभर घेतल्यास शेंकडा ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—
बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
कोला.

पंढरपुरी दर ११ प्रसिद्ध होणारें

### वारकरी वर्तमानपत्र

वर्ष चौथें आरंभ आषाढ शु ११ पासून बक्षिसः —ज्ञानेश्वराचा गाथा अ. ४००
वर्षाची वर्गणी ट० ह. सह १।=
यांत पारमार्थिक लेख, निरूपणें संतचरित्रें, कवनें असतात. पत्र केव्हांही सुरूं करतां येतें व मागणी करतांच बक्षीस पुस्तक पाठवून वर्गणी १०६ वसूल केली जाते.

### जाहिरात

गरजूंनीं अवश्य लक्ष द्यावें.

आकोला येथील हिरजी धरमसी या नांवाच्या जिनींग फ्याक्टरींतील खालील सामान विकाऊ आहे.

( १ ) मेसर्स मारशलीस आणि सन्स या कंपनीचा एक बॉयलर दोन वर्षें वापरलेला आहे. त्याचा आकार ६x२२ आहे. त्याचें वाफेचें प्रेशर १२५ पौंड आहे. बायलर अगदीं नव्या सारखा आहे.

( २ ) मेसर्स मारशलीस आणि सन्स याच कंपनीचें एक इंजिन आहे. त्याची हार्सपावर १९ आहे, १३ इंच सिलेंडरचा डायामेटर आहे. ३५ इंचाचा पिस्टनचा स्ट्रोक आहे त्याची गती ८० आहे. हें इंजिन सुद्धां दोनच वर्षें वापरलेलें आहे.

( ३ ) त्या शिवाय फ्यक्टरीला लागणारे डॉंकी पंप, लेथ, फायर पंपस, डाईस बाक्स, चिमणी वगैरे सामान आहे. सामान अगदीं नवे आहे.

( ४ ) प्लॉट ब्रदर्सचीं ३० जिनें आहेत पण तीं दोन वर्षापूर्वीं लागलेल्या आगीमुळें जरा नुकसान पाऊन प्लाटफार्मच्या खालीं पडलीं आहेत.

वरील सामान घेण्याची कोणाची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. पण जर कोणाला त्याच ठिकाणीं जीन फ्याक्टरी पुन्हा बांधणें असेल त्यांनीं आह्माला समक्ष येऊन भेटावे. फ्याक्टरी पाहण्याकरितां नेहमीं मोकळी ठेवली आहे.

पत्ताः—हिरजी धरमसी.
Out-.Fort Moodi Bazar
Kazi Sayed Street N0 25-
N. G. 82 BOMBAY

### नोटीस

बेशमी— शिवराम सखाराम मास्तर कुणबी रहाणार अकोली बु० तालुके जळगांव जि० बुलढाणा यासः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं अकोली बु० तालुके जळगांव या गावांस रावजी आणि इपन नांवाची कापडाची दुकान सर्व भागीदारांनीं घेतलेली असून सर्वानुमते सदहू दुकानचें सर्व काम करण्यास तुमची नेमणूक झाली असून कांहीं दिवस तुह्मी काम केल्यावर कुबुद्धीनें सर्व कामांत बइमानीचें वर्तन तुह्मी केलेलें उघडकीस आलें. परवानगीशिवाय बहेर गांवाहून मला बोलावून बेपता केला व असामी लोकांकडून रकमाही वसूल करून स्वतः खाल्या. ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांचे आंत तुह्मी आपले जवळ ठेवलेल्या वाहिखात्यावरून सर्व हिशेब आह्मास समजावून देऊन सर्व कागदपत्र वहीखाते कापड व रोकड वगैरे आमचे स्वाधीन करावें, तसें तुह्मी न केल्यास विश्वास घाताबद्दल तुमचेवर काम चालून त्याचा परिणाम तुह्मांस भोगावा लागेल. ता० ११-२-०८ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत तुह्मी दिलेली नोटीस अगदीं खोटी आहे. कळावें. तारीख १९ माहे जुलै सन १९०८ इ०

सही
रावजी आकाजी अडनांव
धड कुणबी रहाणार
सावळ पो. तांमगाव

नं. ग. ८८

## वर्तमानसार

तारिख १७ रोजीं मुंबई येथील नऊ गिरण्या बंद राहिल्या व १२ हजार मजूर कामावर गेले नाहींत. कांहीं मंजूर हायकोर्टा समोर जमले; परंतु त्यांनीं कांहीं गडबड केली नाहीं.

मुंबईच्या पोलीस कमिशनर साहेबांची लेखी परवानगी मिळाल्याशिवाय मुंबईशहरांत सभा भरवूं नये किंवा मिरवणूक काढूं नये ह्मणून मागील आठवड्यांत पो० कमिशनर साहेबांनीं जाहिरनामा काढिला होता परंतु त्याची मुदत शुक्रवारीं रात्रीं १२ वाजतां संपत असल्यामुळें शनिवार ता० १८ रोजीं सकाळीं सहा वाजल्या पासून शुक्रवार ता० २४ राजीं रात्रीं बारा वाजेपर्यंत आणखी एक आठवडाभर मुंबई शहरांत सभा भरविण्यांत येऊं नये किंवा मिरवणूक काढली जाऊं नये असा पो० कमिशनरनीं पुन्हां जाहिरनामा काढिला आहे.

विक्रमपूर येथील सोनारगंज नॅशनल स्कूलचे हेडमास्तर बाबू मखनलाल सेन यांच्या जवळ कांहीं ज्वालाग्राही पदार्थ व रसायनें असल्याच्या संशयावरून पकडून पोलीस सुपरिंटेंडेंट यांनीं त्यांस डाका येथें नेले. योग्य जबाब घेऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं त्यांस जामिनावर खुलें करण्यांत आलें आहे.

मच्छीबझार स्ट्रीटमध्यें रहात असलेले धनाढ्य जमिनदार बाबू प्रभासचंद्र यांस काल ता० १९ रोजीं पहाटे चार वाजतां बॉम्बप्रकरणासंबंधानें सुपरिटेंडेंट मेरिमन यांनीं पकडलें. पकडते वेळीं दोन युरोपियन इनस्पेक्टर व २० शिपाई इतके लोक बरोबर घेऊन सुपरिटेंडेंट साहेबांनीं बाबूंजीच्या घरास वेढा दिला. नेहमींप्रमाणें घराच्या दरवाज्याला आंतून कुलूपें होतीं. घरांतील एका भाडेकऱ्यानें कुलूप काढिलें व पोलिसांनीं आंत प्रवेश केला. प्रभासचंद्र नुकतेच निजून उठले होते. त्यांना साहेबांच्या स्वाऱ्या घरांत आलेल्या पाहून पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. साहेबांनीं आपल्या आगमनाचा हेतु कळवून प्रभासचंद्र यांस गिरफदार केलें. १२१ अ. १२२, १२३ व १२४ या कलमाखालीं गुन्हे केल्याचा वारंटांत उल्लेख होता. प्रभासचंद्र यांच्या घराची झडतीही पोलिसांनीं घेतली व कित्येक कागदपत्र जप्त करून नेले. रीतीप्रमाणें त्याची तपासणी होईलच. झडतीमध्यें ज्वालाग्राही पदार्थ किंवा हत्यारें कांहीं मिळालीं नाहींत. आरोपीस पोलीस ठाण्यावर नेऊन तेथें अटकेंत ठेवण्यांत आलें आहे.

ता. १० रोजीं रात्रीं पुणें येथील सदाशिव पेठेंतल्या हौदाजवळ एक भयंकर आवाज झाल्यावरून दुसरे दिवशीं सकाळीं पोलिसांनीं तपास सुरूं करून संशयावरून त्याच दिवशीं एक दोन घरांच्या झडत्या घेतल्या. ता. ११ रोजीं अहमदनगरापासून पुण्यास येण्याकरतां गोऱ्या शिपायांची एक तुकडी निघाली आहे. पुण्याहून, मुंबईस दोन अंमलदारांसह गोऱ्या शिपायांची एक तुकडी ता. १२ रोजीं गेली असें समजतें.

मच्छलीपट्टणहून तार आली आहे त्यावरून असें समजेत कीं, हरी सर्वोत्तम राव एम.-ए. यांना राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यांत आले आहे. बेझवाडा येथील मॅजिस्ट्रेटच्या वारंटानें त्यांच्या घराची झडती घेतली गेली. राजमहेंद्री कॉलेजच्या प्रिन्सिपालनें विद्यार्थ्यांना ‘ वंन्देभातरम् ’ चीं पदकें, व पट्टे वर्गांत असतांना वापरण्याची गेल्या वर्षी मनाई केली होती; त्यामुळें कॉलेजांतील विद्यार्थ्यांत बरीच चळवळ उडाली. त्या चळवळींत हरि सर्वोत्तम राव यांनीं पुढाकार घेतला होता. ह्याबद्दल त्यांना ट्रेनिंग कॉलेजांतून काढून टाकण्यांत आलें होतें, व त्यांना कधींही सरकारी नोकरी देऊं नये असाही ठराव झाला होता.

ता. १३ रोजीं हायकोर्टांत जस्टिसेस ब्रेट व राइव्हज यांनीं खुदीरामावरील खटल्यांतील अपिलाचा निकाल सांगितला.

णारी चर्चा यांत कांहीं फरक नाहीं. गुप्तपणाचा अभाव हें तत्व दोहोंत सारखें अवलंबीलेलें आहे तर मग छापून प्रसिद्ध होणाऱ्या वादविवादात्मक लेखांवरच कटाक्ष कां? कोणतीशंका कशीही महत्वाची रणकारणी मसलत असो, कशाही नाजुक परिस्थितीतीलें एखादें प्रकरण असो, फारतर काय खुद्द राजा व त्याचे नातेवाईक यांची बाह्यतः खाजगी अशी एखादी हालचाल किंवा वागणूक असो, त्या सर्वांवर पार्लमेंटाचे सभासद जाहिर रीतीनें अभिप्राय प्रगट करूं शकतात. रुसोजपान युद्धाचे प्रसंगीं, अँग्लोरशियन तहाचे वाटाघाटींत, रशियांतील अंतस्थ बंडाळीचे वेळीं आणि अशाच आणखी कित्येक आणीबाणीच्या प्रसंगीं होतां होईतों जाहिर चर्चेला अडकाठी करण्याकडे पार्लमेंटाच्या सभासदांचा कल नाहीं असें अनुभवास आलें आहे. इतक्या निकराचरच्या प्रसंगीं देखील पार्लमेंटाच्या सभासदांची मुस्कटदाबी करणें निंद्य मानलें जातें ही गोष्ट छपलेली नाहीं. कांहीं कांहीं प्रसंगीं अधिकारारूढ सभासदसमूह असें अनियंत्रित विवेचन बंद करतात, पण त्यावेळीं सुद्धां राष्ट्राच्या आपल्यावरील विश्वासास त्यांना विरेस घालावें लागतें. या प्रसंगानें सुद्धां एखाद्या सभासदाच्या विचारप्रकटीकरणास आळा बसतो खरा पण तो राष्ट्राच्या विश्वासावर अवलंबून तात्पुरती माघार घेतो. यांत कोणी असें समजूं नये कीं सत्ताधीशांची अशी भीड घालण्याची वहिवाट सरसहा चालूं रहाते. वास्तविक प्रकार त्याच्या अगदीं उलट आहे. अगदीं निरुपायानेंच या उपायाचें ते अवलंबन करतात आणि अशा प्रसंगांत जास्त हटवादीपणा केल्यामुळें सत्ताधीशांचा पाडाव झाल्याचीं उदाहरणें पार्लमेंटाचे स्वरूपाचे संस्थांत घडलेलीं आहेत. तात्पर्य इतकेंच कीं ज्या संस्थांना मि. नार्डो प्रभृति लेखक अगदीं सत्स्वरूपाच्या अशा मानतात त्यांमध्यें विचारस्वातंत्र्यास आळा घालणें तत्वाच्या दृष्टीनें कोणी योग्य समजत नाहीं. तीच विचारसरणी लेखन स्वातंत्र्याविषयीं मात्र मि. नार्डो यांनीं तितक्या उदारपणानें अनुसरलेली नाहीं असें स्पष्ट ह्मणावें लागतें. वादाचा मुख्य मुद्दा येवढाच आहे. मुद्रणस्वातंत्र्याची मुस्कटदाबी तत्वाला लाथ मारून करणें कधींही योग्य होणार नाहीं येवढेंच आह्मांस स्थापित करावयाचें आहे. पुस्तकें, मासिकें, मासिक, साप्ताहिक, दैनिक पत्रें हे व असेच जे अनेक प्रकार विचार प्रसाराचे आहेत त्यांच्या नाड्या आंखडणें सत्याला, न्यायाला, सृष्टी नियमाला किंवा समाजहिताच्या जपणुकीला विसंगत आहे हें सदैव ध्यानांत ठेवलें पाहिजे. मि. नार्डो यांना आपल्या राष्ट्रांतील कित्येक वर्तमान पत्रांच्या स्वैर वागणुकीची किळस येऊन त्यांनीं लेख लिहिला आहे हें मागें सांगितलेंच आहे. अशा प्रकारची किळस कोणालाही प्रतिपक्षीयांविषयीं उत्पन्न होणें शक्य आहे, हें आह्मांसहि कबूल आहे. पण जेथें समाजाचें हित समाजाच्या दृष्टीनें साधावयाचें असतें तेथें आपण मात्र सर्वज्ञ आणि सत्यात्मे व आपलें प्रतिपक्षीय ह्मणजे असत्याचें केवळ पुतळें अशी भावना धरून चालणें लोकसत्तात्मक पद्धतीला कधींही सुसंगत होणार नाहीं. हें विसरतां कामानये. चार दिवस सासूचें तर चार दिवस सुनेचें असा प्रकार व्यवहारांत सारखा चालू असल्यामुळें आपल्या विषयीं दुसऱ्यांनीं जसें आचरण करावें असें आपल्याला वाटत असेल तसेंच आपण प्रथम वागावें लागतें. हा नियम खरोखरीच्या सास्वासुनांपासून अत्यंत विस्तीर्ण आणि बलाढ्य अशा मानवीसमाजाच्या सत्ताधीश संस्थांतही सारखाच लागूं पडलेला दिसून यतो तसें न होतें तर एका अधिकारारूढ व्यक्तिसमूहानें केलेलीं कामें सर्वथा उलथून पाडण्याकडे अन्यव्यक्तिसमूहाची प्रवृत्ति झाली असती व त्यामुळें सारखी घडामोड सुरू राहिली असती पण लोकसत्ताक पद्धती जेथें जेथें अमलांत आहे तेथील हकीगतीचें सूक्ष्म निरिक्षण करून सुद्धां असा प्रकार ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणें ह्मणजे निसर्गातें विरुद्ध जाणें असें आपचें मत असल्यामुळें तत्वासंबंधानें इतका उहापोह आह्मला करावा लागला. व्यवहार तत्वाला सोडून कधीं कधीं झालासा दिसतो आणि तसें होण्यांत कधीं कधीं हित आहे. भासतें, पण जर तसें मानण्याकडे सरसकट सर्व वेळीं प्रवृत्ती होईल तर ती अत्यंत मोठी चूक होईल. व्यवहार तत्वाशीं विसंगत राहिला तर त्या विवक्षित व्यवहाराच्या मूळाशीं असलेलें तत्व चुकीचें आहे असें ह्मटलें पाहिजे. सर्व व्यवहारांतील परिणामाचें मापन तितक्या सूक्ष्म रीतीनें करतां येणें शक्य नाहीं हें खरें पण वस्तुस्थिति अगदींच अगम्य असेल असें नाहीं. या विचारसरणीचा अवलंब वर्तमानपत्रांच्या स्वतंत्र्याच्या बाबतींत अवश्य झाला पाहिजे. वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य दिल्यानें कांहीं तात्कालिक गैरफायद्याचे प्रसंग उद्भवलेसे वाटले तरी जेणें करून कोणत्याही स्वरूपांत विचारांच्या प्रकटीकरणाला अडथळा होईल असें करणें अती घातक झाल्यावांचून रहाणार नाहीं. स्वातंत्र्य ही निसर्गाची देणगी आहे तिचा उपभोग सर्वांना घेऊं देणेंच रास्त आहे. तशांत विचारविनियम करणारांना एकतर्फी कलानें बद्ध करणें ह्मणजे समाजाची मानासिक व बौधिक प्रगति खुंटविणेंच आहे.

---

## शिक्षणांतील स्वावलंबन.

ग्लासगो युनिव्हर्सिटीच्या चान्सलरचें पद स्विकारतांना लार्ड रोजबरी यांनी एक बरेंच महत्वाचें भाषण केलें. इंग्लडांत व इतरत्र लार्ड रोजबरी यांची राजकारण व इतर सार्वजनिक बाबती यांत कमीजास्त प्रमाणानें पुढारी ह्मणून प्रसिद्धी आहे. राजकारणांत प. वा. ग्लाडस्टन साहेब किंवा त्यांचे कट्टे अनुयायी यांच्यापुढें त्यांचें तेज टिकलें नाहीं खरें, तथापि बऱ्याच प्रसंगीं त्यांचे विचार सर्वांना आदरणीय होत असतात. ग्लासगो युनिव्हर्सिटीचें अध्यक्षपद स्विकारतांना त्यांनीं केलेलें भाषण इंग्लंडात बहुत लोकांना रुचलें असून हिंदुस्थानांतहि तें पुष्कळांना मार्गदर्शक आहेसें वाटू लागलें आहे. स्वावलंबन हा राष्ट्राला अत्यंत उपयुक्त असा गुण असून त्याची वृद्धि करणें हा विश्वविद्यालयांच्या कर्तव्यांतील मुख्य भाग व्हावा असें लॉर्ड रोजबरी यांनीं या प्रसंगीं प्रतिपादिलें. स्वावलंबनाचें महत्व कोणालाही कमी वाटणें शक्य नाहीं तत्रांत लॉर्ड रोजबरी यांनीं ड्रेक, राले इत्यादि ज्या स्वदेशोद्धारक पुरुषांचीं उदाहरणें दिलीं त्यावरून राष्ट्रोन्नतीच्या कार्यांत या गुणाइतका उपयुक्त होणारा दुसरा गुण नाहीं हें निःसंशय आहे. या उपदेशा सबंधानें अनुकूल अभिप्राय प्रगट करतांना इकडील कांहीं विचारी पुरुषांनीं त्याचा सरळ संबंध लावण्याचें सोडून देऊन जरा आडवाटेंत त्याचा फायदा करून घेण्याचें योजिलें आहे. नवा युनिव्हर्सिटी आक्ट पास होण्यापूर्वी कांहीं प्रांतांत व विशेषतः बंगल्यांत सरकारी पैशापासून अलिप्त अशीं पुष्कळ कॉलेजें होतीं. त्यांना या नव्या कायद्यामुळें उतरती कळा लागली. करितां स्वावलंबनाचे तत्वाचे प्रतिपालनासाठीं युनिव्हर्सिटीशीं संयुक्त असलेल्या स्वतंत्र कॉलेजा करितां एक सार्वजनिक फंड उभारण्यांत यावा अशी सूचना बाबू सूरेंद्रनाथ बानर्जी यांच्या ‘बगाली’ पत्रानें केली आहे. स्वावलंबनाच्या उपदेशाचे भरक्यावर पुढें केलेल्या या सूचनेंतील दोष अगदीं उघड आहे. युनिव्हर्सिटीच्या कायद्यामुळें स्वतंत्र कॉलेजांचे हातपाय मोडले आहेत ही गोष्ट सर्वांना कबूल आहे. त्यांची उत्पत्ति, त्यांचा चालू व्यवहार यांकडे लक्ष दिलें असतां, लोकांच्या शिक्षणविषयक आस्थेबद्दल कोणालाही कौतुकच वाटेल. पण दिवसेंदिवस देशाची जी निकृष्टावस्था होत चाललेली आहे तिच्याकडे लक्ष दिल्यावांचून लोकांच्या आस्थेचा व औदार्याचा अंत पहाणें गैर आहे असें आह्मांस वाटतें. शिक्षणाकडे सध्यांची पिढी तीन निरनिराळ्या रूपांनीं पैसे पुरवीत असते. सरकार सार्‍यांतला कांहीं भाग शिक्षणासाठीं लोकांकडून भरण्यांत येतो हे कोणालाही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. युनिव्हर्सिटीशीं ह्मणजे सरकारी शिक्षणपद्धतशीं संलग्न असलेल्या खाजगी संस्थांस मदत ह्मणून सालोसाल कांहीं तरी रकम लोकांकडून देण्यांत येते. या शिवाय स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापण्यासाठीं सर्वत्र फंड गोळा होत आहेतच. हे तिन्ही प्रकार सर्वत्र कमी आधिक मानानें चालू असून कोणत्याही शाळेंत आपला मुलगा पाठवा, त्याची ‘फी’ चुकत नाहींच! इतक्या निरनिराळ्या दिशांनीं शिक्षणाचे पायीं द्रव्य व्यय होत असून त्याचा परिणाम सुशिक्षणाची प्राप्ती तरुणपिढीस करून देण्याचे कामीं कितीकसा होतो याचा जर सूक्ष्म विचार केला तर ‘एक धड ना भाराभर चिंध्या कशाला?’ हाच प्रश्न प्रत्येक विचारी मनुष्याचे मुखांतून निघेल असें आह्मांस वाटतें. यावरून कोणी असें समजूं नये, कीं निरनिराळ्या दिशांनीं प्रयत्न करण्याच्या विरुद्ध हें प्रतिपादन आहे. येवढें मात्र स्पष्टपणें सुचवावयाचें आहे, कीं प्रत्येक मार्गातील आधारभूत तत्वें निश्चित असावयास पाहिजेत. युनिव्हर्सिटीशीं ह्मणजे सरकारी शिक्षणपद्धतीशीं संलग्न असलेल्या संस्था आजच्या स्थितींत निखालस परावलंबी आहेत, त्यांनीं जाणून बुजून तो मार्ग पतकरलेला आहे; त्यांनीं तसें करण्यांत गैर केलें असें सर्वथा ह्मणतां येणार नाहीं. पण पतकरलेल्या मार्गांतील अडचणींतून डोकें वर काढण्यासाठीं इतर सोंगें त्यांनीं आणून लोकांना भूरळ पाडूं नये, त्यांच्यावर विशेष नैतिक दाब पाडूं नये. सरकारनियंत्रित शिक्षणपद्धति ज्यांनीं पत्करिली त्यांनीं हेंही ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं कराचे रूपानें लोकांचे पैसे सरकाराजवळ ठेव ह्मणून आहेत. प्रजेच्या गरजेनुरूप शक्य आणि अवश्य तितके पैसे शिक्षणाचे पायीं खर्च झाले पाहिजेत. सरकार तसें करीत नसेल तर तसें करण्या लावलें पाहिजे. सर्व प्रजेला शिक्षण देणें हें सरकारचें एक प्रमुख कर्तव्य आहे; तें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें जात आहे कीं नाहीं, यावर नजर ठेवण्याचा अधिकार जनतेच्या तर्फे शिक्षणविषयक व्यवसाय करणारांनीं आपल्याकडे घेतलेला आहे असा सर्वांना भरंवसा असतो. ह्मणजे सरकार व प्रजा यांचेमधील शिक्षणाचे बाबतींतील जो संबंध आहे त्यावर नजर ठेऊन लोकांचे हक्क सुरक्षित राखण्याची जबाबदारी त्यांचे शिरावर असते. युनिव्हर्सिटीशीं संलग्न असलेल्या संस्थांत विद्यार्थ्यांची संख्या जशी जशी वाढत जाईल त्या मानानें त्यांची सर्वांची शिकण्याची सोय करणें हें युनिव्हर्सिटीवर ह्मणजे शिक्षणावर ताबा चालविणारांचें कर्तव्य आहे. ‘सर्वारंभीस्तंडुलः प्रस्तमूलः’ या वचनाप्रमाणें हें कर्तव्य द्रव्यव्ययानें बजावलें जातें. जर युनिव्हर्सिटीशीं संलग्न असलेल्या कोणत्याही संस्थेला पैशाची तूट पडली तर ती पुरी करणें सरकारचें कर्तव्य आहे. तर मग पैशाची तूट पडल्यावर लोकांजवळ हात पसरणारे अशा कारनांने व्यवस्थापक सरकारला आपलें कर्तव्य करावयास लावण्याच्या जबाबदारींतून सुटूं पहातात असें होत नाहीं काय? युनिव्हर्सिटीमार्फत जें शिक्षण मिळावयाचें त्याकरितां खर्चाची तजवीज लोकांकडून सरकारनें आधीं करून घेतलेलीच असते. आतां लोकांकडे त्याच कामासाठीं पुनः याचना करणें ह्मणजे एक तर जुलूम आहे किंवा फसवणूक आहे. कोणी स्वसंतोषानें दिल्यास दान घेण्याचा हक्क प्रत्येकास आहे, पण जटापाठिघनपाठ्याच्या वेशांत, अगर कुटुंबवत्सल, गरीब पण निरिच्छ ब्राह्मणाच्या सोंगानें कोणी बळेंच याचना करूं लागल्यास त्याला नाहीं ह्मणण्यांत यत्किंचितही पाप नाहीं. सरकारी पद्धतीचें शिक्षण देत राहून त्यावर लोकांच्या तर्फे कांहींच सत्ता न चालवूं शकणाऱ्या किंवा आपले स्वतःचीं तरतूद सरकाराजवळ असलेल्या लोकांच्या ठेवींतून करून घेण्यास असमर्थ असणाऱ्या संस्थांना लोकांनीं पैशाचा पुरवठा घटकोघटकी करीत जाणें ह्मणजे त्यांना जास्त आळशी आणि परावलंबी करण्या सारखें आहे. यवढ्या साठीं सरकारी शिक्षण क्रमाणप्रमाणें चालणाऱ्या संस्थांनीं वारंवार लोकांना पैशासाठीं सतावण्यांत स्वावलंबन नसून परावलंबन आहे.

## महास्रोत

(राजश्री टिळक यांनीं केलेली प्रस्तुतच्या काळाची राजकीय मीमांसा)

तेजस्वी हिऱ्या विषयीं असें सांगतात कीं त्याचा एका विशिष्ट रसायनिक द्रव्याशीं संयोग झाला असतां त्या हिऱ्यामधून तेजोमय विजा चमकूं लागतात किंवा तेजाचें स्फुल्लिंग तो हिरा बाहेर टाकतो असें दिसतें. ही हिऱ्याची गोष्ट तीच थोर माणसांची होय. त्यांच्यावर संकटें आलीं ह्मणजे तीं फार तेजस्वी व यशस्वी दिसतात. त्यांच्या हातून अशाच प्रसंगीं जगावर उपकार घडतात; किंबहुना संकटें ही कामधेनुप्रमाणें कल्याणश्री सर्वत्र प्रसवते. राजश्री टिळक ह्यांच्यावर चालू असलेल्या राजद्रोहाच्या खटल्याचा प्रसंग जगास असें विदित करित आहे कीं त्यांच्या आत्म्याला तें राजद्रोहाचें पाप शिऊंच शकत नाहीं इतकेंच नाहीं तर महाराष्ट्रांतून राजद्रोह घालविणारा असा कार्यकर्ता पुरुष सरकारास पाहिजे असेल तर तो पुरुष राजश्री टिळक हे होत. गेल्या सोमवार पासून त्यांच्या खटल्याची चौकशी दोन दिवस चालल्यावर गेल्या बुधवार पासून त्यांच्या बचावाचें संभाषण चालूं आहे. आरोपी राजश्री टिळक हे स्वतःच आपले बॅरिस्टर बनले आहेत. शुक्रवारीं ते संभाषण अपूर्णच राहून त्याला पुन्हां आज रोजीं सुरवात होईल. राजश्री टिळक यांचें संभाषण ऐकलें ह्मणजे एक वक्तृत्वाचा महास्रोतच चालला आहे असें वाटतें. त्यांच्या बोलण्यांत एक प्रकारची वीरश्री आहे, विलक्षण सत्यनिष्ठा दिसून पडते आणि त्या बरोबरच त्यांचें अंतःकरण अप्रतिम राजभक्ति पदोपदीं व्यक्त करीत आहे. राजद्रोहाच्या कलमांतील मुख्य गोष्टीचा खुलासा त्यांनीं सर्वमान्य कायदेपंडितांच्या ग्रंथाप्रमाणेंच केलेला आहे. त्यांनीं जुरीच्या मनापुढें प्रस्तुतच्या राजकीय वातावरणाचें चित्र अगदीं तंतोतंत रेखाटलें असून इंडियन समाजाचा त्यांत राजधर्म उत्कृष्टपणें प्रतिपादित केला आहे. अँग्लोइंडियन पत्रकार इंडियन समाजावर जें किटाळ किंवा आरिष्ट ओढित आहेत त्याचा प्रतिकार करण्यासाठीं राजद्रोहात्मक ह्मणून पुढें आलेले लेख लिहले असून त्यांच्या मध्यें इंडियाच्या लोकांच्या वतीनें ब्रिटिश सरकारापाशी हात जोडून भावी राजधोरणासंबंधानें प्रार्थना केलेली आहे. हें समग्र भाषण अद्याप पुरें व्हावयाचें आहे तरी तें सर्वांनीं अवश्य वाचावें अशी आमची आग्रहपूर्वक सुचना आहे. त्याच्या पासून सर्वांना एक सर्वोत्तम राजकीय धडाच शिकल्याचें श्रेय येईल.

## राजद्रोहाचा नवा प्रकार.

दिवसेंदिवस हिंदुस्थानच्या राजकीय वातावरणांत विलक्षण असे फेरफार घडून येत आहेत. सरकाराला प्रत्येक प्रांतांत राजद्रोहाचा वास येत असून तो दाबून टाकण्याविषयीं अट्टाहास चालूं आहे. ज्या ज्या ठिकाणीं सरकारी अधिकाऱ्यांस राजद्रोहाचा संशय आला त्या त्या ठिकाणीं तो संशय रास्त होता असें सरकारी न्यायमंदिरांनीं ठरविलें आहे. राजद्रोहाच्या आरोपावरून कोर्टापुढें आरोपी निर्दोषी ठरून सुटल्याचें उदाहरण अगदींच क्वचित् सांपडेल. मुंबई व बंगाल या प्रांतांची अशा प्रकारच्या खटल्याविषयीं प्रसिद्धि होती, पण आतां मद्रास व संयुक्तप्रांत हेही प्रांत साधारण समाजाप्रमाणें राजद्रोहाचे खटल्यापासून अलिप्त रहाणें शक्य नाहीं असें ठरलें आहे. लेखी व तोंडी अशा दोन प्रकारचा राजद्रोह सरकारच्या मताप्रमाणें हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत सुरू असून तिसरा ह्मणजे त्यांच्या पलिकडच्या पायरीचा राजरोस राजद्रोहहि हिंदुस्थानांत अवतीर्ण झाला आहे अशी खुदीराम बोस याच्या प्रकरणावरून खात्री पटविण्याचा प्रयत्न होत आहे. खुदीरामानें दुसऱ्या एका मनुष्याच्या मदतीनें मिसेस केनेडी यांचा खून केला असा हायकोर्टानें शेवटीं निकाल दिला आहे. खुदीरामाची चौकशी करतांना पोलिस अधिकाऱ्यांना कांहीं जास्त व्यापक स्वरूपाचा कट उघडकीस आणण्याला उद्युक्त होण्याची स्फूर्ती झाली आणि त्या स्फूर्तीचीं फळें सध्यां बाबू अरविंदघोष प्रभृति मंडळी भोगीत आहेत. हा कट खराखुराच आहे किंवा कसें याचा निर्णय अद्याप व्हावयाचा आहे. राजद्रोहाच्या शेवटच्या पायरीचा प्रयत्न कोणी तरी जाणून बुजून संघशक्तीच्या आधारावर करणारे आहेत किंवा कसें, या प्रश्नाचा निकाल लागण्यापूर्वींच, असें कोणी तरी लोक आहेत असा समज करून घेऊन तत्संबंधीं जाहिर रीतीनें वाटावाट चालूं आहे. प्लेगचे सुरुवातीस पुणें येथें दोघां युरोपियनांचे खून झाले तेव्हांही अशाच प्रकारचा कांहीं मंडळीचा कट उजेडांत आणण्याची शक्य तितकी खटपट झाली पण, कांहीं निष्पन्न झालें नाहीं. आतांचा दोघा युरोपियन बायांचा खून व दहा वर्षांपूर्वींचा पुण्याचा खून यांच्यांतील फरक स्पष्ट होण्यापूर्वींच न्यायाचे कोर्टानें कोणतीही गोष्ट निश्चित करण्यापूर्वींच, तो फरक गृहित धरून कोणी कोणी त्यावरून जे खटाटोप केले आहेत त्यांकडे पाहिलें ह्मणजे कोणालाही असल्या वेडगळपणाची कींव आल्यावांचून रहावयाची नाहीं. ही खुलचट प्रवृत्ति सरकारास मोफत सल्ला देणाऱ्या स्वावलंबवाद्यांपासून सरकारचे मर्जीप्रमाणें सल्ला देणाऱ्या कायदेकौन्सिलचे सभासदापर्यंत सारखीच दृष्टीस पडते. बंगाल्यांतील प्रेसिडन्सी विभागातर्फेचे ले. गव्हर्नर यांच्या कायदेकौन्सिलांतील नामदार सभासद बाबू जोगेंद्रचंद्र घोस यांनीं नुकत्याच झालेल्या त्या कौन्सिलाच्या बैटकींत आपल्या मतदारांतर्फे सरकारकडे एक जाहिर आश्वासन सादर केलें. अराजक मंडळ्याचे उद्योग आपल्याला सपशेल नापसंत आहेत असा या आश्वासनांतील मथितार्थ होता. कौन्सिलापुढें असलेल्या कायद्यांतील कलमें किंवा बजेटांतील रकमा यांच्या पलीकडे नामदार सभासदांनीं न जाण्याची खबरदारी घ्यावी ह्मणून सदा दक्ष असणाऱ्या कौन्सिलच्या अध्यक्षांस अद्यापि अनिश्चित अशा एका प्रकारासंबंधानें नामदार सभासदांचें लांबलचक विवेचन किंवा टिपण ऐकून घेणें या प्रसंगीं योग्य दिसलें! यावरून जसा ज्याचा तर्क वाहील तसा तो अर्थ घेईल. कौन्सिलाचा नियम मोडला असें कोणी ह्मणोत किंवा न्यायमंदिरांत चालूं असलेल्या चौकशीचें बाबतींत हा अव्यापारेषु व्यापार झाला असेंही कोणी ह्मणो! त्याबद्दल सर अंड्रयू फ्रेजर यांनीं विशेषशी फिकीर केल्याचें दिसत नाहीं येवढें मात्र खरें. बाबू साहेबांतर्फे आलेल्या आश्वासनाचा व दुसऱ्या एका ना. सभासदांनीं सबंद बहारप्रांतातर्फे केलेल्या खातरजमेचा त्यांनीं इतका अर्थ घेतला कीं हिंदुस्थानांत अराजक चळवळ उत्पन्न झालेली आहे खास. पण तींत फारच थोडे लोक सामील असून बहुतेक प्रजा पूर्णपणें राजनिष्ठ आहे. सर अँड्रयू फ्रेजर यांची वर सांगितलेल्या अश्वासनांमुळेंच अशी समजूत झाली असें मात्र नाहीं. त्यांचें स्वतःचेंही मत तसेंच असल्याचें त्यांनीं याच वेळीं कळविलें. इतर प्रांतांतील अधिकाऱ्यांची समजूत या पेक्षां वेगळी आहे कीं काय याचा खुलासा झालेला नाहीं. पण मुंबईस आणि मद्रास इलाख्यांत महत्वाच्या राजद्रोहासंबंधाच्या खटल्याचे वेळीं सार्वजनिक रस्त्यावर लोकांची गर्दी वगैरे न होऊं देण्यासाठीं पोलिस शिपायी पुरेसे न वाटून कीं काय लष्करी शिबंदी ठेवण्यांत आल्याचें समजतें. कोणी बोलून दाखवितो तर कोणी करून दाखवितो; तशांतला कांहीं प्रकार घडत असल्यास नकळे. बंगाल्यांतील वस्तुस्थितीविषयीं ना. ले. गव्हर्नर साहेबांचें जें मत जाहीर झालें आहे त्यावरून त्या प्रांतात अतितीव्र स्वरुपाच्या व अगदीं निकडीच्या कारणामुळें जन्मास आलेल्या कायद्यांची अंमलबजावणी तहकूब रहावयास पाहिजे असा कोणीही कयास करील. तो खरा ठरणें न ठरणें मात्र परस्वाधीन आहे.

## गरीब बिचारे रीस साहेब!

हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलानें उदयास आणलेल्या नव्या कायद्याचा अंमल अँग्लोइंडियन वर्तमानपत्रांवरही निःपक्षपातानें होणार नां? असा प्रश्न सर हेन्री कॉटन यांनीं पार्लमेंटांत विचारला. अँग्लोइंडियनांचें इंग्लंडांतील नॉटपेड वकील मि. रिस त्यावेळीं हजर होतेच. आपलें कर्तव्य बजावण्याची हीच वेळ आहे असें पाहून त्यांनीं मध्यें तोंड घातलें. ‘ हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांच्या निःपक्षपातीपणावर असा भडीमार करणें योग्य आहे काय? असें शब्द त्यांनीं ठांमून उच्चारिलें! गरीब बिचारे रिस साहेब! त्यांनीं हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास वाचला नाहीं हें मात्र त्यांचें मोठें दुर्भाग्य होय! सिव्हिल मिलटरी गॅझेटचे लेख हरकत घेतां येण्याजोगे असल्याचें पंजाब सरकारनें कबूल केल्यावर सुद्धां त्या पत्रावर कांहीं कायदेशीर काम चालूं झालें नाहीं, हें कदाचित् मि. रीस यांनीं ऐकलें नसेल! मिसेस केनेडीचा खून झाल्यानंतर, बंगाली मनुष्य जवळ येतासा वाटल्याबरोबर त्याला खुशाल गोळी मारण्याचा सल्ला मि. किंगफर्ड यांना देणारे अँग्लोइंडियन पत्रकार बंगाल सरकारच्या लीगल रिमेमबरन्सरना अद्याप कोठें दिसले आहेत! येवढ्याशा तेवढ्याशा खुसपुटावरून खुशाल एखाद्या सबंध जातीवर किंवा वर्गावर तुटून पडणारे अँग्लोइंडियन पत्रकर्ते हिंदुस्थानांत कोणी आढळत नसतीलच तर कायद्याचा अंमल कोणावर करावयाचा? पण वास्तवीक पहातां मि. रीस यांनीं इतकें चिडण्याचें कारणच नव्हतें. हिंदुस्थानांत चालूं असलेला अंमल कितीही निःपक्षपाताचा असला तरी त्या मानवी निःपक्षपाताला कांहीं मर्यादा ही असलीच पाहिजे. आपला तो बाब्या ह्मणणाऱ्याला हिंदुस्थानांत काय किंवा इंग्लंडांत काय कोणीही खुळ्यांतच काढील. मनुष्य कितीही सुसंस्कृत असो, किंवा वेडसर असो, रक्त पाण्यापेक्षां घट्ट असतें हें केव्हांना केव्हां तरी त्याच्या प्रत्ययास आलेंच पाहिजे. आपण अगदीं परमेश्वरासारखे मायापाशविरहित आहों असें कोणाही मनुष्यानें ह्मणणें आमच्या हिंदू तत्वज्ञानांत तरी वेडगळपणांत गणलें जातें. आपल्या हातचा असा मार्ग सोडून देऊन असल्या वेडगळ कल्पनेच्या मार्गें सरकार लागेल असें निदान आम्हांस वाटत नाहीं.

# वऱ्हाडवृत्त.

हवामान—चारपांच दिवस उघाडी मिळाल्यामुळें लोकांचीं पेरणीचीं कामें पुन्हा चालूं झालीं आहेत. रोगराई कांहीं नाहीं ही समाधानाची गोष्ट होय. हवेंत उष्मा अजून आहे यावरून लवकरच पाऊस सुरू होईलसें वाटतें.

पोरखेळ—गेल्या सोमवारीं येथलि सेशन कचेरीच्या भिंतीवर दोनतीन नोटीसा बाळबोधींत लिहिलेल्या आढळल्या. या नोटिशींत असा मजकूर होता कीं लवकरच सेशन कचेरींत बॅांगोळा फेकण्यांत येणार आहे. तेव्हां राजश्री बार साहेब व वकील मंडळी यांनीं फार सावधगिरीनें राहावें. तसेंच राजश्री क्राफर्ड यांनाही आपल्या जीवाचा संभाळण्याची खबरदारी घेण्याविषयीं ताकीद मुद्दाम दिलेली आहे. या नोटीसा हा कांहीं टवाळ व उनाड तरुणांचा पोरखेळ तर खराच पण असा पोरखेळ तावडतोब बंद करण्यासाठीं सरकारांनीं व लोकांनीं एकदिलानें प्रयत्न केला पाहिजे.

झाडा— बंगालच्या बॅांबगोळ्याचा बादरायण संबंध थोडासा आकोल्यापर्यंत येऊन पोचला. तिकडील प्रकरणांतील माफी दिलेला साक्षीदार नरेंद्र गोस्वामी यानें राजश्री पी. एम. बापट बी. ए. यांचें नांव घेतलें होतें. मुंबई इलाख्यांत त्यांचा तपास चालूं असतां ते येथील हेडकान्स्टेबल रा. रा. दत्तात्रय नारायण भिडे यांच्या कडे आले आहेत अशी बातमी तिकडे लागली ह्मणून पुण्याचे पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. देशपांडे हे मुद्दाम आले होते. त्यांनीं गेल्या १७ व्या तारखेस रा. दत्तात्रय भिडे व त्यांचे बंधु विठ्ठलराव भिडे यांच्या घराची झडती घेतली. त्या झडतींत पत्रव्यवहार वगैरे कांहींच सापडला नाहीं.

दोन घडयाळें एकदम घेणारास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिशया घेणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस साखळी सुधां शिशीस ।.



रासेकॉफ सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचे खिशातील घडयाळ रु. १४ सेलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.

नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायासिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्या वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ९०० शे माणसांपेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेलेचभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आम्ही आमचा दवखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. गरजू लोकांनी अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी बाळंतरोग, पडू इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता:—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलीचे शाळेजवळ

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला

नं. स. १

आमचें देशंठ यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुम्ही कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी श्रीमंत नानासाहेब ( ग्वालेर ) फाळके दप्तरदार

नाही सस्तात् परोपर्यं

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आम्ही येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व वक्तशिर पाठवीला जाईल. आम्हांस शेंकडों पत्र आली आहेत.

पत्ता:—

श्रीनीवास बाळकृष्ण हेले जनरल

नं ७२ मर्चंट व कमिशन एजंट येवले.

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरेंडम व आर्टिकल्स ऑफ आसोसिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकुमावरून

पी. सी. जोगळेकर आणि कंपनी

म्या. एजंटस्

नं. २३

## नोटीस

नोटीस बेशमी पांडुरंग आकाजी गांवडे राहणार तांदुळवाडी प्र. व ता. आकोट यांस:—

खालीं सही करणार इज कडून कळविण्यांत येतें कीं आम्ही दोघी मीळून दि. मु. नं. ७६ सन १९०६ चे प्रकरणांत तुम्हाला मुखत्यार पत्र दिलें होतें. परंतु आपसांत तुमचा व आमचा वाद झाल्या मुळें तें मुखत्यार पत्र नोटीशीनें रद्द केलें होतें. आतां तुमची आमची आपसांत समजूत झाल्यामूळें पूर्वीचे मुखत्यार पत्र पून्हा: कायम ठेविलें आहे कळावे. ता. ३०- ६- १९०८

सही

तुळशी मर्द सोनाजी वाव राहणार तळेगांव निशाणी हातची बांगडी जि० आकोला ता. आकोट

नं. ग. ८४

## नोटीस

नोटीस बेशमी भुली मर्द झाबु दुमाळ जात कुणबी रा. वाडेगांव ता० बाळापूर जि० आकोला इसः—

खालीं सही करणार रा० वाडेगांव यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आपले सासूचे इच्छे विरुद्ध लोकांचे नादी लागून मजला व आपले सासूस त्रास देऊन खर्चांत पाडण्याकरितां तुझे नवऱ्याचें मरणसमयींचे मजला सांगणें वरून मी तुझे व तुझी सासू नामे रुखमाई या उभयतांचें आजन्म पावेतों पालन पोषण करण्यास तयार असतां खालीं लिहिलेले जिनगी पैकीं कांहींची अफरा तफर करण्याचे इरायानें नसते उपद्याप सुरूं करणार आहेस असें मजला कळल्यावरून या नोटिशीनें तुजला कळवितों कीं तुजला योग्य व कायदेशीर कामा करितां व अन्नवस्त्राकरितां लागणारा पैसा पुरविण्यास मी तयार आहे तरी तूं कोणाचे फंदांत न पडतां या पुढें असें भलते चाळे करून तूं फसून जाऊन आम्हांसही विनाकारण खर्चांत घालूं नयेस हाणून तुजला ही नोटीस देत आहे. त्या प्रमाणें तूं वर्तन करावेस अशी माझी व तुझे सासूची इच्छा आहे. कळावें

जिनगीचे वर्णनः—

स्थावर माल आमचे ताब्यांतीलः—

| | |
|---|---|
| शेत सर्वे नंबर ५५१ एकर २३४६ अकार रुपये ३४ व शेत सर्वे नं. ५६९ एकर १५८२ आकार रुपये —२८ | सालीम आंब्याचीं झाडे ३१ सुद्धां |

२ घर धाब्याचे खांब ३६ अडा खांबावर माडी पुढें बसरी वगैरे एक हिस्सा सर्भ्यां तूं रहातेस ते.

(३) पाग १ खांब १८ ओसरी कवेलु सुद्धां व मोठी पु० प० २३ द० उ० १५

(४) जंगम माल तुजजवळ असलेलाः—

घरांतील पेवांत ज्वारी आहे ती.— खंडी ३

चांदीचे डागिनें. तोडे वजन ७०॥ तोळे, देडवाळे ३१।१॥, गुंडवाळे ४०, कोपरवाळे २१, कडीपाटल्या २८, गोफ १३, आरसी ५, हसळी २०, आगदाना २, वगैरे शिवाय साखळीचा करदोडा, साधा कर, दोडा, कंगण्या, वाकेचरीकडें, कंठी पोलट २, दंडातीलकडीं २ भरीव, दंडातीलकडीं ९ पोकळ, दंडवाळ्या २, गोफ इत्यादि.

सोने —पुतळ्या तोळे ...., तांदुळमणी ..., पदक मासे ६, .... १॥ नथ तुल्याची अंदाज किंमत रुपये ६० कळावें ता. १६ माहे जुलै सन १९०८ इ०

सही

मुक्काम वाडेगांव | खुशाल नारायण दुमाळ

नं. ग. ८५

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटिशीनें मी कळवितों कीं वर लिहिलेली जिनगी कायदेशीर रीतीनें माझे ताब्यांत आली असून त्यापैकीं शेतांची मी ३ वर्षांपासून वहिवाट करीत आहे तरी कोणी ही वर लिहिलेले भुली मर्द झाबु दुमाळ इजपासून गहाण, खरेदी, बक्षीस किंवा पत्यानें कोणीही घेऊं नये. घेतल्यास त्याबद्दल आम्ही किंवा इस्टेट जबाबदार नाहीं सदहूबद्दलचें कोणतेंही कृत्य बातल समजलें जाईल. याची एक नक्कल मे. डि. राजिष्टर आकोले, सबरजिष्टर बाळापूर व पाटील पटवारी वाडेगांव यांचे माहितीसाठीं पाठविली आहे. त्याप्रमाणें त्यांनीं व्यवस्था करावी ही माझी विनंती आहे. कळावें ता. १६-७-१९०८ इ०

सही

खुशाल नारायण दुमाळ

नं. ग. ८६

## नोटीस

नोटीस बेशमी— रंभु वलद कुकाजी काळोकार कुणबी रहाणार मौजे कोलारी ता० खामगांव जि० बुलढाणा यांसः—

नोटीस देणार भुलाई मर्द येडुजी कुणबी देवचे रहाणार जळब ता० खामगांव जि० बुलढाणा मी तुम्हांस या नोटिशीनें असें कळवितों कीं कोर्टांतील, दिवाणी मुलकी फौजदारी वगैरे कामें करण्या कारितां तुम्हांस मी कुलमुखत्यार नेमून पांच रुपयांचे स्टांपावर मी तुम्हांस कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन तें शेगांव सब रजिस्ट्रार कचेरींत नोंदून दिलें आहे. यावरून तुम्ही कोर्टांत माझे तर्फे दोन तीन वेळां हजर राहून काम केलें पण तुम्ही माझे विरुद्ध पक्षास मिळून माझे दाव्याची नुकसानी काढल्यावरून तुम्हांस कळवितें कीं तुम्ही माझे तर्फे कोर्टांत हजर राहून कारवाई करूं नये. कारवाई केल्यास ती ममला कबूल नाहीं. तुम्हांस दिलेलें कुलमुखत्यारपत्र रद्द आहे असें समजावें. यापुढें कारवाई केल्यास ती रद्द समजली जाईल. करितां लेखी जाहीर नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. तारीख १६-७-०८ इ०

सही

भुलाई मर्द येडुजी देवचे

नं. ग. ८७ दस्तुर खु०

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन श्री अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनी आमची औषधें वरक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टीफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यस पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजीवनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक, रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग, व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांना उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३९ गो०-१ रु० ७९ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ५९० गो० रु.

२ अपुर्व नेत्रांजन:-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ ॥ भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम करे .

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, पात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टीफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक आपल्या समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरू झाला यचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो र्णवरर्धेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास ले डाक्टरांनी सर्टीफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कल्याणवधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रितानें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यासआमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकुण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वद्यै

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—BOMBAY

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a givensnm, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* to tmploying a portion of their annual income or profits in effecting life polc at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes hup his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of t he step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

. 2

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २७ माहे जुलई सन १९०८ इसवी [अंक २८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A Phillips एजंट
नं ७३

### ✻ इकडे लक्ष द्या ! ✻

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जित्रत्या, पिठोरी, पाठोडा, रंगीत पिठोरी १। रु० यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेकडा १ रुपया, व पिठोरी शंभर घेतल्यास शेकडा ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—
बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

### नोटीस

परशाराम वल्लद कवडजी खेडके कोळी राहणार मारोडी ता. व जिल्हे आकोले यांसः—

गंगाराम वल्लद कवडाजी कोळी राहणार मारोडी याजकडून देण्यांत येतें कीं तुह्मीं व आह्मीं साक्षांत बंधु असुन आंपण गेले दोन वर्षा पर्यंत अविभक्त कुटुंबात येकत्र पणे रहात होतो. जी वडीलोपार्जीत जिनगी होती तिच्या आणि वडील वारल्यानंतर जी मिळकत आपण समाईक कूटूंबांत संपादन केली तिच्या योग्य रितीनें वाटण्या न करितां बायकांचे न बनल्यामुळें मी दोन वर्षापासून वेगळा राहात आहे समाईक जिनगी पैकी माझे ताब्यांत मारोडी येथील १ शेत व १ पाग व खपरेलाचे घर व आपोती येथील एक शेत इतके असून बाकीची शेतें घरे आणि देणें घेणें तुमचे ताब्यांत आहेत सर्व मिळकतीची बरोबर निमे निमे वाटणी करून देणें विषयी तुह्मास अनेक वेळां ह्मटलें असतां तुह्मी टाळा टाळ करित आहां यासाठीं या द्वारे कळवितो कीं ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत समाईक जिनगीची वांटणी करून आमचा निम्मे हिस्सा आह्मांस द्यावा व पावती घ्यावी तसें न केल्यास रितीप्रमाणे न्यायाचे कोर्टमार्फत तजवीत होईल व त्याचा खर्च तुह्मास सोसावा लागेल कळावे ता० २०।७।०८

सही
गंगाराम वल्लद कवडाजी
कोळी रा. मारोडी नि.

नं. ग. ९०

### नोटीस

रा. धनसुकदास सुकरामदास मारवाडी राहणार वांगरगांव तालुके आकोट

यांसः—

गरीबशा वल्लद मोसमशा सौदागर राहणार पातुर्डे तालुके जळगांव यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमने आमचे दरम्यान ता. २२ मे सन १९०५ रोजीं शराकतनामा जाला आहे. शराकतनाम्यांतील शर्तीप्रमाणें तुह्मी वागला नाहीं. आह्मी देशाहुन आल्यावर दुकान तपासून पाहतां फरक दिसला तों

तुह्मी शेगांवकर महंमदजीवा यास हुंडी रकम रुपये २०० दोनशाची संमत १९६४ मिती मार्गशिर्ष शुद्ध १३ ला दिली त्याप्रमाणें तेल्हारे येथील मदन गोपाल मारवाडी यांस महमदजीवा याणी रुपये दिलेल्या हुंडीचा जमाखर्च दुकानांत कां केला नाहीं.

नफ्याचे रकमेपैकी ८— आणा तुह्मी उचलुन ८≡ आणे दुकानांत जमा करावे असें शराकतनाम्यांत लिहीलेलें असून तुह्मी जी रकम नावे मांडून घेतली ती फार आहे असें करण्यास तुह्मास आधीकार नव्हता.

रुईचा व्यापार दुकानांत करण्याचा नसून तुह्मी कां केला त्या व्यापाराचे आह्मी जबाबदार नाहीं.

कपड्याचा जो व्यापार केला तो आमचे परवानगीवांचून मनाईला न जुमानतां केला त्या व्यापारांतील रकमेचे व्याजाचे नुकसान जाले ते तुह्मांस द्यावे लागेल

शंभर रुपयावरचे आसामीस आमची मंजुरी घ्यावी असें शराकतनाम्यात असून तुह्मी कां केली.

तुमचा बहीनवी इश्वरदास उकळीकर याचे नांवे तुह्मी जी रकम मांडली आहे त्यांस ती मागतली असतां तो ह्मणतो की मला कवडीही देणें नाहीं त्यांस या रकमेचा खोटा जमाखर्च कां केला.

शराकतनाम्याच्या शर्तीप्रमाणें तुह्मी वागला नाहीं सिवाय मी आल्यापासून तुह्मी वांगरगावी जाऊन राहीले दुकानचा सर्व हिशोब समजून देण्यांकरितां दोन चार वेळां बोलाविले तरी तुह्मी येत नसुन कधीही समजाऊन दिल्या नाहीं खाली लीहीलेला माल दिसत नाहीं

तीजोरीची किल्ली ३ मोठी १ लहान २
१ तंबाखुचे कोठडीची कीली.
१ लहान संदुकाची किल्ली.
१ शराकतनामा

या प्रमाणें जिनसा नाहीं. सबब नोटीशिनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापसून ८ दिवसांत येऊन सर्व हीशोब समजुन द्यावा जो माल नाहीं तो द्या आणि आसाम्याची रुजु रूजवात करून द्यावी तसें न केल्यास फौजदारीत फिर्याद केली जाईल.

शराकतनाम्यावरून आतां तुमचा हिस्सा दुकानांत मी देशाहुन माघ महिन्यांत आलो तेव्हांपासून ठेविला नाहीं पुर्वींचे नफा नुकसानी भरून घेतली जाईल कळावे ता० २२-७-०८ इ.

सही
गरीबशा मोसम सवदागर राहणार पातुर्डा ता० जळगांव
नं. ग. ९१ दस्तुर खुद्द

### नोटीस

रा. रा. हंसराज गुजराज मारवाडी राहणार गोंदिया जिल्हा भंडारा यांसः—

नोटीस देणार हाजी उस्मान बाबा दुकान आकोट जिल्हा आकोला यांच्या तर्फे मुखत्यार वली महमद हाजी उस्माम यांजकडून कळविण्यांत येते कीं तुम्हास आह्मी पूर्वींच टपाल मार्फत दोन नोटिसा दिल्या पण त्याचा जबाब कांहींच न आल्यामुळें आतां जाहिर नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तांदुळाची पोती २९ धाडली ती नमुन्या प्रमाणें नव्हती ह्मणून तुह्मास कळविलें तेंव्हा तुमचा मनुष्य सुरजमल हा आला व त्यानें असें सांगितलें हीं पोतीं पाठविण्यांत चुक झाली, तुह्मी आमची चिठ्ठी येईल त्याप्रमाणें आमच्यासाठीं विकून टाकावी किंवा आह्मी लिहू त्या माणसाच्या हवाली ती पोती करावीत. वरील संकेताप्रमाणें तुह्मांकडून कांहींच तजवीज झाली नाहीं. ह्मणून आह्मी दोन नोटिशी दिल्या. आतां अखेरचे कळविण्यांत येतें कीं तुमचा माल राजश्री मारुती रामजी जिनगर आकोट यांच्या दुकानांत भाड्यानें ठेविला आहे. याची सर्व जोखीम तुह्मावर आहे. आह्मी देशांत चाललो. या नोटिशीचा खर्च तुह्माकडून वसूल केला जाईल. कळावें. ता. २१।७।०८

सही ( गुजराथींत )
हाजी उस्मान बाबा तर्फे वली
महमद हाजी उस्मान दस्तुर
नं. ग. ८९ खुद्द आकोट

## वर्तमानसार

राम वनवासाला गेला असतां अयोध्या जशी ओसाड दिसूं लागली, पांडव वनवासास गेल्यावर हस्तिनापुरींतील नागरिकांच्या मुखांवर जशी प्रेतकळा आली त्याप्रमाणें आज मुंबापुरीची स्थिति झालेली आहे. रा० टिळकांस शिक्षा झालेली ऐकून प्रत्येकाच्या हृदयाला भयंकर धक्का बसला आहे. ज्याच्या त्याच्या तोंडातून शोकोद्गार निघत आहेत. ज्याप्रमाणें एखाद्या कुटुंबांतला आवडता मनुष्य अंतरावा त्याप्रमाणें बळवंतरावजींच्या वियोगदुःखानें मुंबापुरींतील लोकांस वाटत आहे व त्यांचीं अंतःकरणें वज्रपातानें विदीर्ण झालेलीं आहेत. चारुदत्ताला वधस्तंभाकडे नेत असल्याचें गवाक्षद्वारांतून पाहून ज्याप्रमाणें सौधावर बसलेल्या स्त्रियांनींही अश्रुपात केला याप्रमाणें बळवंतरावजींच्या शिक्षेचें वर्तमान ऐकून स्त्रिया, मुलें व अशिक्षित लोकही शोकाकुल झालेले आहेत. मुंबई शहर ह्मणजे सदा व्यापारानें व रहदारीनें गजबजलेलें, [illegible] पण [illegible] जिकडेतिकडे सामसुम दिसत आहे. दुकानें, मार्केटें वगैरे बंद असल्यामुळें मोठमोठ्या रहदारीचे रस्ते आज शून्य दिसत आहेत. हिंदूशिवाय मुसलमान, पारशी वगैरे एतद्देशीय लोकांनाही रा. टिळकांवरील प्रसंगाविषयीं सहानुभूति वाटत असल्याचें ठिकठिकाणच्या उदाहरणावरून दिसत आहे. शहरच्या आजच्या उदास देखाव्यात भर घालण्या करितांच कीं काय भगवान् सहस्ररश्मीनेंही मेघमंडलांत दडी मारली आहे. [illegible] त्यामुळें प्रत्यक्ष निसर्गावरही या शोकवर्तमानाचा परिणाम झाल्याचा भास होतो. रा० टिळक यांस झालेली शिक्षा ह्मणजे राष्ट्रीय आपत्तिच होय असें एकंदर देखाव्यावरून उघड दिसत आहे. इं. प्र.

## राजश्री टिळक

राजद्रोहाच्या खटल्याचा शेवट होतांना पूर्वी झालेली शिक्षा त्यांनी कबूल केल्या.

नंतर मामुल वहिवाटीप्रमाणें त्यांना ' तुह्मांस शिक्षा कां देऊं, नये हा नेहमींचा प्रश्न विचारण्यांत आला. त्यावर रा. टिळक यांनीं असें

## बाणेदार उत्तर

दिलें कीं, " जरी ज्यूरीनें बहुमतानें मला अपराधी ठरविलें आहे तरी माझी मनोदेवता मी निरपराधी आहे असेंच सांगत आहे. सर्व लोकांवर व सर्व राष्ट्रांवर तिचा अंमल चालू आहे अशी श्रेष्टतर **शक्ति खास आहे. माझ्या लिहिण्यानें व बोलण्यानें माझ्या अंगीकृत प्रिय कार्याचा जितका उत्कर्ष व्हावयाचा त्या पेक्षां मला कष्ट भोगून त्या कार्याचा जास्त उत्कर्ष** व्हावा असाही ईश्वरी संकेत असेल. "

या प्रमाणें रा. टिळक यांचें करारी बाण्याचें उत्तर झाल्यावर लोकांच्या अटकळीबाहेर जज्जांनी ६ वर्षें काळ्या पाण्याची व हजार रुपये दंडाची शिक्षा १२४ अ कलमाखालीं प्रत्येकी तिन वर्षांप्रमाणें दोन लेखांबद्दल सहा वर्षे व ता. ९ जूनच्या लेखाबद्दल १५३ अ कलमाखालीं एक हजार रुपये दंड राजद्रोहाच्या दोन आरोपी बद्दलच्या शिक्षा एक शिक्षा पुरी झाल्यावर दुसरी याप्रमाणें चालणार आहोत. या प्रमाणें शिक्षा देतांना जज ह्मणाले कीं, " रा. टिळकांसारख्या विद्वान् व वजनदार मनुष्याला शिक्षा देतांना मला किती दुःख वाटत आहे तें मी वर्णन करूं शकत नाहीं. दहा वर्षांपूर्वी रा० टिळक यांना अशाच अपराधाबद्दल शिक्षा झाली होती व त्या वेळीं जज्जांनीं सौम्य शिक्षा दिली होती. सरकारानें त्याहीपेक्षां दया दाखविली. ज्या **अपराधा बद्दल रा० टिळक हे दोषी ठरले आहेत त्या अपराधाला पीनल कोड मध्यें जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा सांगितलेली आहे. आतां मी जी शिक्षा सांग**णार आहे ती पाहून कांहींजण ही अस्थानीं दया झाली असेंही ह्मणतील. रा. टिळकांनी तो अपराध पुनः केला, यावरून त्यांची मनःस्थिति ब्रिटिश सरकारच्या द्वेषानें विपरीत अथवा विकृत झालेली दिसते. अशा प्रकारचीं वर्तमानपत्रें ह्मणजे देशाची साडेसातीच होय. रा. टिळक ह्मणतात त्याप्रमाणें त्यांनीं तत्काळ ते लेख लिहिलेले नाहींत. तर बांबाचा अत्याचार झाल्यावर पंधरा दिवसांनीं त्यांनीं ते लेख लिहिले व तशा प्रकारची लेखमाला त्यांनीं तसल्याच धोरणानें चालूं ठेविली. आरोपीची शरीरप्रकृति लक्षांत आणून आणि शांतता व शिस्त यांच्या संरक्षणाचा व रा. टिळक हे ज्याच्यावर आपले फार प्रेम आहे ह्मणून सांगतात त्या देशाच्या हिताचा विचार करितां, रा. टिळक यांना यापेक्षांही हलकी शिक्षा दिली तर गुन्हा व शिक्षा यांत प्रमाण ठेवण्याचें माझें कर्तव्य मी केल्यासारखें होणार नाहीं. रा. टिळक कांहीं काळ देशाच्या बाहेर असतील तर बरें. "

कोर्टीत जमलेल्या सर्व लोकांमध्यें रा० टिळकांविषयीं मनःपूर्वक सहानुभूति स्पष्ट दिसत होती. कांहीं यूरोपियन लोकांनाही शिक्षा ऐकून वाईट वाटल्यासारखें दिसलें.

कोणाचे कांहींही विचार असोत, परंतु रा. टिळक हे

## असामान्य पुरुष

आहेत ही गोष्ट कोणीही नाकबूल करूं शकणार नाहीं.

मन निवातन झालें नाहीं तोपर्यंत शरिरावरचें वस्त्र टाकून देणें गैरशिस्त आहे. युरोपियन सोजीर असो, किंवा हिंदु गोसावी असो, स्त्रीपुरुषसमाजांत वापरतांना त्यानें वस्त्र प्रांवरणें अवश्य आहे त्र्यंबेकश्वर येथें गोदावरी मेळा असतांना नाग गोसाव्यांस नग्नस्थान करण्याची परवानगी न मिळाल्या कारणानें ते उद्विग्न होऊन कुशावर्त व त्र्यंबकेश्वर येथें अन्नसेवन न करितां धरणें धरून बसले आहेत अशी बातमी आंतांच नाशिकाहुन आली आहे. पंजाबांत रावीतीरीं हिंदुस्त्रीया जेथें धुणेंपाणें करितात अशा पाणवठ्याच्या ठिकाणीं घोड्यावरून सहल करणारे कांहीं गोरे सोजीर स्नानानंतर घोड्यावर नागवे बसून इकडे तिकडे स्वैरपणानें हिंडतांना गेल्याच्या मागील मंगळवारीं पुष्कळांनीं पाहिले. हिंदुस्त्रियांना असा देखावा पाहून काय वाटलें असेल तें सांगणें नकोच कांहीं मडमा जेथें स्नानें करीत आहेत अशा ठिकाणीं कांहीं व्रात्य हिंदु नागवे हिंडू लागले तर मडमांना व साहेबांना काय वाटेल बरें ? मिलिटरी खात्यांतले अधिकारी असल्या सोजिराच्या तोंडांत लगाम देतील काय ?

बाबू अरविंद घोष यांस क्षयरोगानें पछाडल्याचीं चिन्हें दिसत आहेत.

मुंबई येथील बॅरिस्टर मि० सेटलूर यांस हैसूर येथील चीफ कोर्टांत आक्टिंग जज्ज नेमण्यांत आलें आहे.

टोलीगंज येथील बांब प्रकरणा संबंधानें खरी हकीकत अशी आहे. दोन युरोपियन गृहस्थांनीं कांहीं डायनामाईट घेऊन त्यास बत्ती लावून बार काढला, असें ' एंपायर ' पत्र ह्मणतें.

मुंबईचे चीफ प्रे. म्याजि० मि० ॲस्टन यांनीं अरुणोदय पत्राचे संपादक रा० धोंडो काशिनाथ फडके यांचे वरील राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल सांगून त्यांस इं. पि. कोडच्या १२४ अ कलमान्वयें गुन्हा केल्याबद्दल १४ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली.

# मुंबई शहरची ता० २३ ची स्थिति

## दुकानें, मार्केटें बंद,

### गिरण्यांसंबंधी बातमी.

### पोलीस व लष्कर यांचा बंदोबस्त

रा० टिळक यांना ६ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा व एक हजार रुपये दंड अशा प्रकारची शिक्षा झाली त्याबद्दल दुःख प्रदर्शनार्थ आज रोजीं मुंबई शहरांतील हिंदु, मुसलमान व पार्शी लोकांनीं आपलीं दुकानें बंद केलीं आहेत. मांडवी, दाणा बंदर तिन्ही कापड मार्केटें व बहुतेक शाळा बंद आहेत. ग्रँट मेडिकल कॉलेजांतील हिंदु विद्यार्थी गैर हजर होते असें कळतें. मंगळदास मार्केट ६ दिवस बंद राहील अशी वदंता आहे. शहरांत प्रत्येक मनुष्य उदास दिसतो. ठिकठिकाणीं सोलजरांच्या पार्ट्या दंगा होण्याच्या भीतीनें बंदोबस्ता करितां ठेवण्यांत आल्या आहेत. मदनपुऱ्याचे बाजूच्या ४-५ गिरण्या बंद आहेत. बाकी मुपरिबाग, पेटीट, इ. डी. सॅसुन, सरस्वती, बाम्बेकाटन इयादि मिल्स चालूं आहेत. दुपारच्या रजेनंतर कामकरी लोक परत कामावर आले नाहींत ह्मणून बऱ्याच गिरण्या दुपारानंतर बंद झाल्याची बातमी आहे. कोटांतील पानवाल्यांच्या दुकानांत विड्यातंबाखुखेरीज करून बाकींची विक्री बंद आहे. शहरांत लोक हवालदिल स्थितीमध्यें असून रस्तोरस्ती घोळक्यानें फिरत आहेत. दुकानें बंद असल्यामुळें एकंदर शहराचा देखावा निर्जनवनाप्रमाणें भासत आहे. सोल्जर लोकांच्या राखून ठेविलेल्या पार्ट्या पैकीं एक परेळ पोष्ट आफिसजवळचे पोलिस स्टेशनांत ठेवण्यांत आली आहे. व दुसरी भायखळापुलाचे जवळील फिलिप्स आणि कंपनीच्या दुकानावरचे माडींत असून त्यापैकीं एक सोल्जर रस्त्यावर फिरत आहे. एक पार्टी सुपारी बागेकडून परत सॅमुनडाकला परत आणली आणि त्याची जागा भरून काढण्याकरितां दुसरी पार्टी सुपारी बागेकडे पाठविण्यांत आली. प्रत्येक नाक्यावर २ पासून ४ पर्यंत खोटी होती.

---

# वऱ्हाडसमाचार

आषाढ वद्य ३० शके १८३०

---

## गांवकामगार

गांवकामदारांच्या विपन्नावस्थेचा प्रश्न ना. चीफ कामिशनर साहेब बहादुर यांनीं हातीं घेतलेला असून त्याचा विचार ते सहानुभूतिपूर्वक करणार आहेत, हें ऐकून त्या वर्गाला व एकंदर रयतेला समाधान वाटल्यावांचून राहणार नाहीं. हा प्रश्न याच प्रांतांच्या नव्हे तर हिंदुस्थानच्या ज्या ज्या भागांत गांवचें काम तेथील स्थानिक प्रमुख रहिवासी घराण्यांकडून वंशपरंपरा करून घेण्याची वहिवाट आहे, तेथील अधिकाऱ्यांना आज कित्येक वर्षे घोटाळ्यांत घालून बसलेला आहे. प्रत्येक सरकारी मुल्की काम शेवटी गांवकामगारांच्या हातून होत असतें हें लक्षांत घेतलें ह्मणजे त्यांच्या कामाचें व जबाबदारीचें महत्व कळून येईल. जन्ममृत्यूची नोंद, शेतसाऱ्याची वसूली, पिकाची आणेवारी, रयतेची प्राप्ती, दिवाणी व फौजदारी कोर्टांच्या हुकमाची अंमलबजावणी या आणि अशाच इतर सर्व कामांची सुरवात अगर समाप्ती गांवकामगारांचे हातून होते. इतक्या निरनिराळ्या कामांशी ज्यांचा संबंध येतो असा कामगार गांवकामगारांखेरीज दुसरा कोणी नाहीं असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. ही सर्व कामें करतांना भिन्न भिन्न खात्यांच्या अधिकाऱ्यांशीं येणारा संबंध व त्यांची पायधूळ गांवीं पडली असतां त्यांची करावी लागणारी सरबराई या गोष्टी गांवकामगारांस किती जिकिरीस आणतात हें 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे. बरें इतकें जबाबदारीचें त्रासाचें व मान्य तेच्या दृष्टीनें अगदीच कमी फायद्याचें काम करणारांना त्या बद्दल उत्पन्न मात्र सरकारी कचेरींतील चपराशापेक्षांही कित्येक वेळां कमी असतें. हें अर्थगोष्टी ठेवणारें उत्पन्न वंशपरंपरा आहे येवढीच कांहींना लालूच वाटण्यासारखी असते आणि वाड वडिलांनीं संपादलेली 'हरळीची मुळी' आपल्याला खावबत नसली तरी आपल्या वंशजांकडून तरी ती घालविल्याचा दोष आपल्याकडे येऊ नये येवढ्याच कारणासाठीं ती जतन करण्याकडे सर्व पाटील पटवाऱ्यांची प्रवृत्ति दिसून येते. वंशजांच्या दोषाची अगाऊ भीति आणि सरकारी अधिकाऱ्यांची त्रासदायक वाढती अपेक्षा या दोन अडचणीच्या कचाट्यांत गांवकामगारी चालविणारा मनुष्य अगदी मेटाकुटीस येतो, पण त्यांतून निभावण्याला मात्र त्याच्या हातचा असा कांहीं उपाय नाहीं. कामाचे प्रकार रोज रोज नवे उत्पन्न होणार, आज खानेसुमारी तर उद्या जमीन मोजणी, परवां देवी खात्याला मदत तर आणखी एखाद्या दिवशीं जंगल खात्याची खिजमतगारी अशी नव्या नव्या स्वरूपाचीं कामें प्रत्यही हातून झाली पाहिजेत आणि मुशाहिरा मात्र गोकर्णांत! बरें येवढ्यावरहि भागतें तरी पुरवतें. पण कामांत चूक झाल्याबद्दल दंडाची भीति डोळ्यापुढें नेहमी उभी. आज अमुक साहेब आले, उद्यां तमुक रावसाहेब आले, आतां इन्स्पेक्टर तर घटकाभरानें चीफ कॉन्स्टेबल, देवी डाक्टर येऊन जातात तो सेटलमेंट आफिसर, रेंजर साहेबांच्या मागोमाग शाळा खात्याचे डेपुटी, या प्रमाणें अधिकारीमालिकेची वर्दळ सारखी सुरू असतां इतक्यांच्या लवाजम्याची सरबराई करणारा मनुष्य केवढा कुशल असला पाहिजे याची कल्पनाच करावी. अधिकारी सरकारी कामासाठीं आलेले, त्यांचें घरचें काम आहे थोडेंच, त्यांची तरतूद गावकामगारांनीं ठेवावी असा कायद्याचा हुकूम साडेतीन रुपड्या मुशाहिरा मिळविणाऱ्या पाटलानें गांवांतील संभावित जमेदारावर व वाण्याउदम्यांवर महार जागल्याच्या हातीं हुकूम सोडावयाचे! पण ते पाळणार कोण ! आणि काय ह्मणून ! सरकारी अधिकाऱ्यांची सरबराई गांवांतील उदम्यांना कांहीं कारणांमुळें परवडली नाहीं

तर त्याचा दोष मात्र पाटीलपटवाऱ्यांवर ! अशी स्थिति ! पण ती लक्षांत घेणारा भेटला आहे येवढें तरी त्यांना समाधान वाटेल. वऱ्हाडच्या मुल्की वसुली खात्याच्या रिपोर्टावर अभिप्राय देतांना ना. चीफ कमिशनर साहेब बहादुर यांनीं या प्रश्नासंबंधानें जें विवेचन केलें आहे त्यावरून वस्तुस्थिति त्यांच्या लक्षांत चांगल्या रीतीनें आली आहेसें दिसतें. कामांत चुक झाल्यास मात्र दंड आणि काम विशेष चांगलें केल्यास मात्र कांहीं बक्षीस नाहीं अशी स्थिति बरोबर नाहीं हें पाहून दंडाची शिक्षा देण्याची प्रवृति बंद व्हावी असें कळविण्यांत आलें आहे. दंड होण्याचें बंद झालें तरी गांवकामगारांस मिळणारा मुषाहिराच अपुरा आहे हेंही नामदार साहेबांच्या ध्यानांत आलें असून त्या कामीं ते सदयअंतःकरणानें विचार करणार आहेत नवीं कामें शिकण्याबद्दल गांवकागारांची नाखूषी केवळ मुशाहिऱ्याच्या कमतरतेमूळें होती असें अनुभवांतीं नामदार साहेबांस कळून येईल असा आह्मांस भरंवसा आहे. हिंदुस्थानांतील पूर्वींच्या राज्यव्यवस्थेतील गांवकामगार एवढाच शेष उरलेला आहे. ज्या स्वरूपांत त्यांची योग्यता राखण्याचा हेतु पूर्वींच्या काळीं होता तसाच तो आतांहि राहिल्यास गांवकामागराच्या हातून अपेक्षित कार्य उत्तम तऱ्हेनें तडीस जाण्यांत कसूर होणार नाहीं. हे गांवकामगार नुसते मुल्की खात्याचे सर्वांत खालच्या दर्जाचे नौकर नसून ज्या ग्रामसंस्थांच्या आधारावर राज्यव्यवस्था उभारण्याचा हिंदुस्थानातील लोकांचा अनादिकालापासून परिपाठ होता, त्या संस्थांचे हे मुख्य कार्यकर्ते अध्यक्ष व मंत्री होते असें इतिहास सांगतो. इतर सर्व अधिकार तहाहयात केले तरी कोणाही राज्यकर्त्याला गांवकामगारांचे अधिकार वंशपरंपरा केल्यावांचून गत्यंतर दिसलें नाहीं असा अनुभव आहे आणि त्यांतील बीज हेंच आहे कीं हिंदुस्थानांतील लोकांच्या अंगीं ग्राम संस्थांविषयींचें जें प्रेम बाणलेलें आहे तें गांवांतील प्रमुख व सर्वांच्या भरंवशाच्या पुरुषा खेरीज इतरा कडून गांवचा कारभार करवून घेण्याला त्यांना प्रवृत्त करूं शकत नाहीं. गांवकामगारांकडून उत्तम कारभार व्हावा अशी अपेक्षा असणें योग्य च आहे पण तें तसें होऊं शकण्याची तरतुद करणें तितकेंच महत्वाचें आहे येवढें मात्र सदैव मान्य झालें पाहिजे. एकंदर राज्यव्यवस्थेतील कामगारांत गांवकामगार हे कनिष्ट दर्जाचे असूं शकतील पण त्यांच्या अधिकाराचा जेथें प्रत्यक्ष पारेणाम व्हावयाचा तेथें ह्मणजे त्यांच्या गांवांत तेच सर्वांत श्रेष्ठ नसले तर कितीही कसोशी केली तर काम इष्ट तितक्या उत्तम रीतीनें व बिनबोभाट व्हावयाचें नाहीं. या बाबतींत इंदूर संस्थानचे माजी महाराज श्री० तुकोजी राव होळकर यांचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. महाराजांची स्वारी गावगन्ना दौऱ्यावर निघाल्याबरूर जागजागीं जे दरबार होत त्यांत गांवकामगार व प्रतिष्ठित रयत यांच्यासाठीं बिछायतीची उत्तप व्यवस्था असून दिवाण, सुभे, तहशिलदार व तसेच दुसरे तहाहयात पगारी अंमलदार यांना दरबारांत उभे रहावें लागत असे. गांवांत वंशपरंपरा अधिकार चालविणाऱ्या कामगारांची इभ्रत याप्रमाणें पगारी अधिकाऱ्यांपेक्षां जास्त मानणें रास्त आहे असाच या उदाहरणावरून अर्थ निघतो. ही इभ्रत त्यांची सांपातिक स्थिति त्यांच्या महत्वानुरूप ठेवल्यावांचून कायम राखली जाणार नाहीं. आणि इभ्रतीखेरीज निदान गांवांत तरी कोणी कोणाचें ऐकत नाहीं. गांवकामगाराच्या बारीक सारीक चुका त्यांच्या अल्पशिक्षणाकडे लक्ष दिल्यास क्षम्य वाटल्या पाहिजेत आणि अशाच सहानुभूतिपूर्ण दृष्टीनें त्यांकडे पहाण्याची ना० चीफ कामिशनर साहेबांची प्रवृत्ति आहे ही संतोषाची गोष्ट आहे. शहरांतून, मोठमोठ्या सरकारी कचेऱ्यांतून आणि इतर सुविद्य व्यवसायांच्या आगरांतून जी सुशिक्षित व वाकबगार मंडळी दृष्टीस पडते ती पूर्वी केव्हां तरी खेडेगांवांतूनच तिकडे गेलेली आहे. गांवांत शिक्षणांचें साधन नाहीं व त्याची चहा अगर संभावना होणें शक्य नाहीं असें झाल्यावर आपला गांव सोडून आपली वतनवृत्ति सोडून शहराकडे आणि वंशपरंपरागत व्यवसाया खेरीज अन्य व्यवसायांकडे वळण्याची त्यांना इच्छा कां होते याचें कारण शोधूं गेल्यास सांपडणें कठीण नाहीं. चांगलें शिक्षण मिळाल्या नंतर गांवकामगाराचें जिकिरीचें काम अर्धपोटी करीत बसण्यापेक्षां गृहत्याग करून शिक्षणाचे आधारावर सुखानें दिवस काढणें ज्यांना बरें वाटतें अशी अनेक उदाहरणें गांवकामगार घराण्यामध्यें आढळून येतात. ही त्यांची प्रवृत्ति बदलल्या खेरीज हा प्रश्न यशस्वी रीतीनें सुटावयाचा नाहीं अशी आमची नामदारांपाशीं नम्रपणाची विनंती आहे.

---

## फयाक्टरी कमिशन

गिरण्या कारखाने वगैरेतील कामाच्या पद्धतीसंबंधानें चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झालेला असून त्यावर तज्ज्ञ गृहस्थांचें मताहि प्रसिद्ध झालें आहे. आमच्या इकडील गिरण्यांचें नियमन करणाऱ्या कायद्याच्या बाबतींत लंकशायर वाल्यांना मध्यें तोंड घालू देणें लोकांना बिलकूल पसंत नाहीं हें या कमिशनच्या चांगले ध्यानांत होतेसें दिसतें. इंग्लंडमधील कायदे जसेच्या तसेच हिंदुस्थानांतील गिरण्यांना लागूं करूं जाणें बिलकूल इष्ट नाहीं असें कमिशननें आपलें मत रिपोर्टाचे आरंभींच दिलें आहे. मजुरांच्या संबंधांतली हिंदुस्थानांतील स्थितीची इंग्लंडमधील स्थितीशीं तुलना होणें अशक्य आहे हें तर खरेंच पण त्यापेक्षांहि कारखान्यांच्या कारभाराचें नियमन करतांना देशाचें, मजुरांचें व देशाच्या उद्योगधंद्याचें हित लक्षांत घेऊन कायदे झाले तरच ते परिणामीं देशाला फायदेशीर होतील, हें तत्व कमिशननें मान्य केलेलें दिसत आहे. कामिशननें आपल्या कामांत लंकेशायर वाल्यांच्या हिताकडे नजर देऊन कोणत्याही सूचना केलेल्या आहेत असें वाटत नाहीं. ना. विठलदास ठाकरशी यांच्यासारख्या प्रमुख देशी कारखानदारांनाहि कमिशनच्या एका सूचनेखेरीज बाकीच्या सर्व कबूल आहेत यावरून आणि मुंबईच्या इतर प्रमुख कारखानदारांनीं आपलीं मतें कमिशनच्या सूचनांना बहुतांशी अनुकूल दिलीं आहेत या वरून हें अनुमान बरोबर ठरतें. कमिशनची उत्पत्ति कशी झाली ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे पण त्यांत सुदैवाची गोष्ट ही आहे कीं ज्या मुंबईच्या गिरण्यांतील गैर व्यवस्था अगर 'गुलामगिरी' संबंधानें मुंबईच्या 'टाइम्स' पत्रानें टाहो फोडून कमिशनची स्थापना करविली तिचा मागमूसहि कमिशनला आढळून आला नाहीं. हंगामी कारखान्याखेरीज व विणकाम करणाऱ्या गिरण्याखेरीज इतर कारखान्यांत वाजवीपेक्षां जास्त काम मजुराकडून करवून घेण्यांत येत नाहीं अशी कमिशनची खात्री झाली. उलट पक्षीं कलकत्याकडे तागाच्या गिरण्यांत विणकर लोक पंधरापासून सोळा तास पर्यंत कामावर असतात असें कळतें. मध्यान्हीं अर्धा तास सुटी देण्याची पद्धती बहुतेक सर्वत्र कोणी पाळीत नाहीं असें कमिशनच्या नजरेस आलें आहे. त्याचप्रमाणें यंत्रें वगैरे साफ करण्याकरितां कांहीं मजुरांना रविवारीं पांचचार तास बोलावण्याची बेकायेदेशीर रीती मुंबई इलाख्याखेरीज सर्वत्र आहे. सध्यांच्या कायद्यानें बायकांना कामावर लावण्यासंबंधाच्या नियमामुळें कारखान्याचे मालक व मजूर या दोघांनाही अडचणीची अशी स्थिति उत्पन्न होते आणि ह्मणून या बाबतींत बहुतेक सर्व ठिकाणीं कायद्याचें उल्लंघन होतें असें कामिशनचें मत आहे- आग्राखेरीज बहुतेक सर्व संयुक्त प्रांत, पंजाब, दक्षिण मद्रास, या प्रांतांतील कारखान्यांत व बंगाल्यांतील कपाशीच्या गिरण्यांत लहान मुलांना, कायद्याकडे सपसेल दुर्लक्ष करून मोठ्या मजुरांइतके तासपर्यंत कामास लावतात. आग्रा, मुंबईईलाखा, मध्यप्रांत व ब्रह्मदेश यांत मुलांकडून काम घेण्याच्या मुदतीच्या संबधांचे कायदे पाळण्यांत येतात. मुलांना भरपूरवेळेपर्यंत कामास लावणें व कायद्यांत सांगितल्या पेक्षां कमी वयाच्या मुलांकडून काम घेणें या दोन अनिष्ट प्रकारांबद्दल कमिशननें जास्त आग्रहाच्या शिफारसी केल्या आहेत. मधली सूट्टी न देतां रात्रीं आठ वाजेपर्यंत मुलांकडून काम घेणाऱ्या कारखान्यांचीं उदाहरणें कमिशननें दिलीं आहेत. आश्चर्य हें कीं इतक्या संबधांत ज्यांचेवर जबाबदारी आहे असें अधिकारी इतके दिवस स्वस्थ कसे बसले होते?

पुऱ्या वयाच्या मजूरांच्या शरीरप्रकृतींत कांहीं कमीपणा आलेला नाहीं असें कमिशनला आढळून आलेलें आहे. जरासें ढिलेपणाणें काम करण्याच्या पद्धतीमुळें अशी स्थिति राहिलेली आहे. त्याचप्रमाणें चौदा पासून सतरा वर्षांच्या मुलांना सबंद वेळ कामास लावीत असूनही त्यांची प्रकृति बिघडलेली दिसून आली नाहीं. पण जाडी आणि उंची यांचें मान मात्र किंचित उतरलें आहे. लहान मुलांच्या संबंधांत विशेषतः कपाशीच्या गिरण्यांत कायद्याचें कसें उल्लंघन होतें हें ध्यानांत घेतलें ह्मणजे कमिशनना हीं मुलें अशक्त आणि रोड अशीं दिसून आलीं यांत नवल नाहीं. या बाबतींत कमिशननें अशी सूचना केली आहे कीं नऊ आणि चौदा या वर्षांच्या दरम्यानच्या मुलांकरितां कामाचे तास साताऐवजीं सहा करावेत आणि या दर्जातील मुलांपेक्षा जास्त वयाचीं बायका व मुलें यांना सकाळीं साडे पाचाच्या पूर्वीं व रात्रीं सातच्या नंतर कामास लावूं नये अशा प्रकारच्या सूचनेची जरूर होती असें वस्तुस्थिती अवलोकन केल्यावर कोणालाही वाटेल. पूर्णवयाच्या लोकांच्या कामाच्या मुदतीचें नियमन त्यांनीं प्रत्यक्ष नव्हे तरी अप्रत्यक्ष मार्गानें केलें आहे. चौदा पासून सतरा पर्यंत वयाच्या तरुणांचा एक वर्ग करून त्यांच्या कामाची मर्यादा बारा तासाची असावी अशी कमिशनची सूचना आहे. लहान मुलांच्या कामाचे तास सातांचें सहा तास करावे सकाळीं व संध्याकाळीं साडे पांच वाजल्या नंतर सांत वाजण्याचे आंत या दोन्ही वर्गांतील मुलां कडून व बायका कडून काम घ्यावें एक सारखें सहा तास काम केल्यावर अर्धा तास विश्रांती देववावी अशा कमिशनच्या मुख्य सूचना आहेत. पाहिल्या सूचने संबंधानें तकझ्झाडून खरमरीत टीका होऊन नापसंती दर्शविण्यांत आली आहे. अशा प्रकारचा निराळा वर्ग काढल्या नंतर त्यांच्या कामाची मर्यादा बारा तासांची करणें हें तर पुष्कळांना मुळींच पसंत नाहीं. ना० सर विठ्ठलदास ठाकरसे यांनीं बारा तासांची मर्यादा ठेवावी असें आपल्या विरुद्ध अभिप्रायांत प्रतिपादन केलें. दिवस असे तोंपर्यंत काम करण्याच्या पद्धतींतील कायदा कमिशनच्या इतर सभासदांच्या लक्षांत आला नाहींसें दिसतें. ना० ठाकरसी यांच्या सूचनेप्रमाणें निरनिरनिराळ्या ऋतूत अकरापासून तेरा तास पर्यंत काम दिवसाचे प्रकाशांत या वर्गाचे मनुष्यांस करावें लागेल. स. १८९० मध्यें बसलेल्या फ्याक्टरी कमिशननें या प्रश्नाचा चांगला विचार केला होता आणि त्याचेविरुध्द सध्याचे कमिशननें खात्रीकारक असा मुळींच पुरावा पुढें केलेला नाहीं. हिंदुस्थानांतलि कपाशीच्या २२४ गिरण्यापैकी १०० गिरण्यांत विजेचे दीवे आहेत आणि यांपैकीं पुष्कळ गिरण्यांत दीवे असून मुद्दां सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काम चालतें. असें असल्यामुळें सध्यांच्या कमिशनच्या या सूचनेमुळें बऱ्याचशा गिरण्यांचें फार नुकसान होण्याचा संभव आहे.

## मनःक्षोभ

अखेर राजद्रोहाचा कायदा विजयी झाला आणि राजश्री टिळक यांस सहा वर्षांच्या काळेपाण्याची शिक्षा भोगण्यासाठीं मुंबईहून स्पेशल ट्रेनीनें साबरमतीच्या तुरुंगाकडे हालविण्यांत आलें. ही शिक्षा किती तरी भयंकर! न्यायमूर्ती दावर यांस वाटलें कीं आपण फारच फार दया करीत आहों आणि गुन्हा व शिक्षा यांचें प्रमाण समतोल ठेवण्यासाठीं त्यांनीं आपल्या औदार्याची त्रेधा उडवून घेतली. जेथें लोकपक्ष एकीकडे व सरकार एकीकडे असा प्रकार आहे तेथें राजकीय सत्ताच्या विरोधामुळें प्रजेमध्यें अप्रीती उत्पन्न करणाऱ्या लेखाबद्दल काळेपाण्याची शिक्षा देणें ह्मणजे तारतम्यभावाला तिलांजली देण्यासारखें होय. राजश्री टिळक ह्मणजे लोकपक्षाचा राजा होय. अशा लोकोत्तर सत्पुरुषासारख्यांच्या लेखांचा प्रतिबंध करण्याचा उपाय झटला ह्मणजे सरकारी राजधोरण असें बदलत गेलें पाहिजे कीं प्रजाजनाच्या अंतःकरणांत प्रेमाचे झरे वाहूं लागतील. जेथें लोकांचीं अंतःकरणें सरकारी राजद्रोहाच्या विचारांशी जुळत नाहींत तेथें राजद्रोहाचा कायदाच बदलला पाहिजे असें आह्मी ह्मणतो. मुद्रणस्वातंत्र्याला मर्यादितपणा आणण्यासाठीं, वर्तमानपत्रांचे लेख मनोहारी करण्यासाठीं आणि तद्वारा नवीन पिढीच्या अंतःकरणांत राजप्रीती वृद्धिंगत करण्यासाठीं जर सरकारी प्रयत्न असतील तर आह्मी निश्चयानें पण नम्रपणानें कळवितों कीं राजश्री टिळकांचें काळेपाणी आबालवृद्धांचीं अंतःकरणें प्रक्षुब्ध करीत आहे, आणि कायद्याच्या दहशती खालीं अंतःकरणांच्या कपाटांना सरकारी कुलूपें लागलीं आणि वर्तमानपत्रें कामश्चाटका, बेहरिंगची सामुद्रधुनी इत्यादि विषयाकडे वळलीं तथापि हा सरकारचा मुत्सद्दीपणा नाहीं, त्यांचें राजधोरण दूषित झालें आहे आणि लोकपक्षाची ही पायमल्ली इंडियन राष्ट्राला सर्वस्वी घातुक झाली आहे. राजश्री टिळक देहानें लोकांपासून दूर राहतील पण त्यांचीं उदार तत्वें लोकांच्या अंतःकरणांत जागृत राहतील. आह्माला मोठी चिंता ही वाटते कीं सरकार व लोकपक्ष हीं दोन्ही एकदिलाचीं झाल्याशिवाय हल्लींचा प्रसंग टळण्यासारखा नाहीं. लोक काय ह्मणतात तें सरकारनें ध्यानांत घेतलें पाहिजे आणि सरकाराला लोकपक्षाच्या बाजूला आणण्यासाठीं प्रजाजनांनीं देखील सामोपचारानें, प्रेमाच्या सलगीनें व राजनिष्ठेच्या सौहार्दानें सरकाराला वळतें करून घेण्यास शिकलें पाहिजे. सध्यां उभयपक्षामध्यें तात्कालिक कांहीं गोष्टीमुळें होत गेलेला द्विधाभाव भिन्नपणा व आपपरबुद्धि हीं भेदक कारणें वाढत गेलीं आहेत; त्यांचे निर्मूलन करण्यासाठीं उभयतांनीं अनन्य भक्तिभावानें व वात्सल्यानें परस्परांचीं मनें प्रसन्न राखण्यास पुनरुक्त प्रयत्न केला पाहिजे. राजकीय प्रकरणांत गुन्हेगारांस शिक्षा देतांना किंवा लोकांशीं वागतांना सरकार व लोक यांनीं ही खालील सदुक्ती सदैव ध्यानांत धरावीः—

प्रेमाच्या अमृतें रसना ओलावली ।
वृष्टि केली जलें आनंदाच्या ।

## राष्ट्राची अग्निशुद्धी

हल्लीं राजकीय वातावरणांमध्यें जो भयंकर क्षोभ झाला आहे त्याची चिकित्सा करण्याचें स्वातंत्र्य वर्तमानपत्रकारांस नाहीं असें आह्मांस पक्कें वाटतें. शब्दयोजना कडू असो किंवा गोड असो, तात्पर्यार्थाकडे व लेखकाच्या मनोवृत्तीकडे पाहावयास पाहिजे असें राजश्री टिळक ह्मणत होते पण आतां मुंबई हायकोर्टानें शब्दसमुद्रावरच सर्व भिस्त ठेविली आहे; त्यांच्यातून शब्दशक्तींनीं जो मनोरंग पृष्ठभागावर उठेल तोच खरा. परिस्थिती सर्वच बाजूला ठेविली पाहिजे असा जवळ जवळ अर्थ निघतो. सरकारचें चित्त बाँब गोळ्यानें क्षुद्र झालें आहे आणि तशांत लोकपक्षाकडून सरकारावर कडू शब्दप्रयोगाचा जो भडिमार झाला त्यामुळें राजद्रोहाच्या खटल्याचा वणवा सर्वत्र पेटविण्यांत आला आहे. आह्मास तर असें वाटूं लागलें आहे कीं सरकारची चूक अशी झाली कीं विलायतचा पार्लमेंटरी नमुना या देशांत स्थापण्याचा प्रथम गौरव केला, लोकांच्या दृष्टीपुढें ब्रिटिशशाहीचें स्वराज्य उभारलें आणि लोकांच्या हातीं राज्यसूत्रें देण्याचा संकल्प जगजाहिर केला तेव्हां लोक अशा रामराज्याच्या वैभवश्रीनें एकदम दिपले, त्यांच्या दृष्टीचें क्षितीज मोठें विस्तृत झालें, आणि असें वाटूं लागलें कीं आपण सरकारापाशीं जें मागूं तें सरकारला थोडेंच वाटेल. अशा प्रसंगीं परस्पराविषयीं आदरबुद्धि व प्रेमभाव हीं स्वैर नांदू लागलीं. पण जेव्हां ब्रिटिश हिताचा व इंडियन हिताचा खटका पडूं लागला, आपापला स्वार्थ उभयपक्ष पुढें पुढें करूं लागला व प्रजेला उच्च शिडीवरून खालीं ढकलण्याचा प्रयत्न सरकारी अंमलदार करूं लागले तेव्हां पूर्वीच्या प्रेमभरा बरोबरच त्वेष उद्वेग, व निराशा हीं फैलावत चाललीं. यजमानानें गौरवानें याचकाची कामना प्रवृद्ध करावी आणि नंतर त्याला दरवाज्या बाहेर जसें ठेवावें तसा प्रकार सरकार व इंडियनप्रजा यांच्या मध्यें घडला आहे. उभयपक्षीं चूक अनुभवाच्या वृश्चिकदंशानें आतां चांगली कळली आहे तेव्हां उभयतांनीं परमेश्वराच्या साम्राज्यांत जवळ राहून किंवा प्रसंग विशेषीं दूर राहून निरनिराळीं प्रेमबंधनें उत्पन्न करण्यास शिकलें पाहिजे. प्रजेनें आपल्या पायावर उभे राहावें ह्मणजे प्रजात्मक सरकारलाहि आपोआपच चालावें लागेल आणि राष्ट्रपुरुषाची प्रगती चिरंतन चालू राहील. राजश्री टिळक यांच्या चुक्या कांहींहि असोत पण त्यांच्या चुकीचें पारिपत्य करितांना सर्व राष्ट्राला उतरंडीच्या घसरगुंडीला लावण्याची मोठीच चूक झाली आहे. ब्रह्मदेश, उत्तरहिंदुस्थान, वायव्यप्रांत, मद्रास, मध्यप्रांत इत्यादि सर्व हिंदुस्थानचे अत्रपत्र इतके प्रचलित झाले आहेत कीं या दुःखाच्या आवेशानें दुकानें बंद आहेत, गिरण्यांतील मजूर संप करीत आहेत, बंदुकीच्या गोळींनें शांतता ठेवावी लागत आहे. ही गोष्ट असेंच कळवितें कीं राजद्रोहाच्या खटल्यांनीं सर्व इंडियन राष्ट्राचा अपमान केला आहे आणि चालत आलेल्या राजनिष्ठेच्या आम्रवृक्षाची गोड फळें कडू वृंदावनाप्रमाणें फेंकून दिलीं आहेत लार्ड मोर्ले. यांच्या कारकीर्दीनें जो अमृताचा पेला लोकांच्या पुढें आणिला तो त्यांच्याच कारकीर्दींत लोकांच्या समक्ष फोडून टाकण्यांत आला आहे. ईश्वरी संकेतांत कोणतीच गोष्ट वाईट नसली पाहिजे तेव्हां कदाचित् राजश्री टिळक यांचें काळेपाणी ह्मणजे राष्ट्रपुरुषाची अग्निशुद्धि असली पाहिजे असें आम्हीं समजतों.

## रिस्ले सरक्युलर

रिस्ले सरक्युलर सुप्रसिद्ध आहे. विद्यार्थ्यांनीं राजकीय सभांस जाऊं नये, राजकीय संस्थांत शिरूं नये आणि कोणत्याच राजकीय प्रकरणांत त्यांनीं अंग असूं देऊं नये ह्मणून या सरकारी हुकूमानें आपली द्वाही पूर्वींच फिरविली आहे. ही मनाई आजपर्यंत सरकारी हुकूमांत होती पण यापुढें तिचा पूर्ण अंमल केला जाईल असें सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांस निक्षून सांगण्यांत आलें आहे. ही ताकीद नुकतीच प्रत्येक वर्गांतील विद्यार्थ्यांस स्पष्टपणें कळविण्यांत आली आहे तेव्हां यापुढें विद्यार्थ्यांनीं एक तर हा हुकूम पाळावा किंवा शाळा सोडावी. तिसरा मार्गच राहिला नाहीं. सध्यां विद्यार्थिमंडळांत मोठा वाद पडला आहे. आह्मी विद्यार्थी मंडळींस असें सुचवितों कीं त्यांचें वय स्वयंसिद्ध कार्य करण्याचें नाहीं आणि त्यांस पालनकर्त्यांचा, गुरुजनांचा व राजकर्त्यांचा शब्द पाळलाच पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांची कांहीं विशिष्ट परिस्थिती असेल त्यांनीं आपल्या पालनकर्त्यांची आज्ञा घेऊन नंतर कोणता तो मार्ग स्वीकारावा. रिस्ले सरक्युलर चुकीचें असेल पण सध्यां ती सरकारी आज्ञा आहे. हा सरकारचा कायदा सरकारी शाळांस व सरकारी ग्रँट घेणाऱ्या शाळांस लागूं आहे. जेथें जो नियम चालतो तो त्या संस्थेतील विद्यार्थ्यांनीं अक्षरशः पाळलाच पाहिजे. रिस्ले सरक्युलर बदलून घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर नाहीं. ही गोष्ट त्यांच्या पालकांकडे आणि नागरिकांकडे आहे; आणि ते जर आपल्या कर्तव्याला चुकतील तर निदान तें कर्तव्य विद्यार्थ्यांचें नाहीं हें त्यांनीं पदोपदीं ध्यानांत धरलें पाहिजे. सरकारी नियम बदलून घेण्याच्या रिती आहेत. त्याच रीतींचा अंगिकार केला पाहिजे. सरकार आपल्याच शाळांत मुलांस धाडा असा आग्रह करित नाहींत तों पर्यंत सरकारी शाळा पसंत नसल्यास खानगी शाळा स्थापण्याची गोष्ट नागरिकां कडे आहे. ज्याचें कर्तव्य त्यानें ओळखून घ्यावें आणि विद्यार्थ्यांनीं आपल्या पालकांची व नागरीकांची मनीषा त्यांच्या कृतीवरूनच ताडून पहावी. शाळा सोडण्याचा प्रपंच त्यांस नको आहे. खानगी शाळा चांगल्या सुव्यवस्थित निघतील तेव्हांच रिस्ले सरक्युलराची पीडा टाळण्यासाठीं विद्यार्थ्यांनीं काय तो आपल्या मनाशींच निकाल करावा.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— दोन दिवसांत पाऊस बरा झाला आणि जवारीची पेरणीही चांगली साधली. रोगराई ह्मणण्यासारखी विशेष नाहीं.

रा० रा० नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. एल एल. बी. डेपुटी क्लार्क निसबत सेशन कोर्ट, उमरावती यांस दारव्हा येथें मुनसफ नेमण्यांत आलें.

रा० रा० इ. मार्शल आसि. कमिशनर निसबत चीफ कमिशनर यांस खामगांव येथें स डिव्हीजनल आफिसर नेमण्यांत आलें. आणि रा. रा. सोराबजी शापूरजी एक्स्ट्रा आसि० कमिशनर यांची तेथील बदली रद्द करण्यांत आली.

रा. गोविंद बल्लाळ जोशी सबजज्ज यांस मोर्शी येथील कोर्टावर नेमून तेथील आक्टींग सबजज्ज रा. रा. रामराव माधोराव वाठोडकर यांस १ ले आगष्टपासून मोर्शीसच मुनसफ नेमण्यांत आलें.

एक्स्ट्रा असि. कमिशनरांच्या वर्गावर्गांत वऱ्हाडच्या खालील गृहस्थांस बढती मिळाली आहे:—

रा. रा. — बढतीचावर्ग

धनजीशहा दोराबजी दादी मास्तर

स्ट्रेसी वग ७ — ६
वर्ग ६ — ५

बाँबगोळा—गेल्या सोमवारीं पहाटेस मुंबईहून नागपुरास जाणारी प्यासेंजर गाडी स्टेशनांत आली असतां तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या डब्या खालीं एक बांबगोळा उडाला. आवाज मोठा झाला पण प्राणहानी किंवा इतर नुकसानी कांहीं झाली नाहीं. बांबगोळा कसा उडाला हें अद्याप कळत नाहीं. पण ही गोष्ट फार शोचनीय झाली. येथील लोक व सरकारी अधिकारी मोठ्या घोटाळ्यांत पडले आहेत.

यवतमाळचे 'हरिकिशोर' चे प्रस्तुत कर्ते रा. रा. नरहर विठ्ठल भावे यांच्यावर राजद्रोहाचा खटला चालू आहे. आरोपी जामीनदार न पटल्यामुळें तुरुंगांत आहे.

दिल्लीकडील देशभक्त रा. रा. सय्यद हैदर रेझा हे नागपुराहून येथें आले होते पण प्रकृतीच्या अस्वस्थ्यामुळें त्यांनीं पंधरा मिनिटेंच गेल्या शनिवारीं उर्दू भाषेंत जाहिर भाषण केलें व लागलीच सायंकाळच्या मेल गाडीनें ते पंजाबाकडे रवाना झाले. हे गृहस्थ फार कळकळीनें, आवेशानें व कळवळ्यानें बोलले आणि ह्मणाले कीं सत्याचा सरळ मार्ग सोडूं नका ह्मणजे हातबिडी, बंदिवास, व इतर मृत्युकारक आपदा हींच राजकीय हक्क मिळण्याचीं द्वारें होतील.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००।. |
| सोनें | | २४।= |
| चांदी | | ७० |
| जवस | | १३९ |
| जवारी | | ८८ |
| गहूं काठे | | १३१॥ |
| बनशी | ७॥ | १९० |
| तेल | | ९।= |
| सरकी | | ११॥।= |
| तुप | | ११ |
| कापूस | | ४७ |